
# छात्र प्रबोधन

सौर आश्विन, शके १९३४। वर्ष १३ अंक १
मूल्य रुपये पंधरा



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

# छात्र प्रबोधन
# दीपावली विशेषांक २०१२

## ‘दिवाळी अंक – वितरण व्यवस्था – विशेष निवेदन’

‘छात्र प्रबोधन’ च्या सभासदांसाठी व दिवाळी अंकाची स्वतंत्रपणे नोंदणी केलेल्या वाचकांसाठी **२९ ऑक्टोबरनंतर शंभरहून अधिक गावांमध्ये दिवाळी अंकांच्या वितरणाची व्यवस्था केली आहे. या सर्वांचे पत्ते या अंकात पृष्ठक्रमांक २० ते २४ येथे दिले आहेत.**

दिवाळी अंक जास्तीत जास्त सभासदांना वेळेत व खात्रीशीर मिळावा यासाठी या वितरण केंद्रांची साखळी आपण निर्माण केली आहे. सर्व वितरण केंद्रांवरील केंद्रप्रमुख व कार्यकर्ते स्वयंसेवीवृत्तीने, कोणताही आर्थिक मोबदला न घेता, हे काम हौसेने करत असतात. **आपण सर्व सभासदांनी दिवाळीपूर्वी आपला दिवाळी अंक, हा अंक किंवा छात्र प्रबोधनच्या वर्गणीची पावती दाखवून, संबंधित केंद्रांवरून घेऊन जावा** व दिवाळीच्या सुट्टीत फराळाबरोबरच दिवाळी अंकाच्या वाचनाचा आनंद लुटावा.

---

**छात्र प्रबोधनतर्फे एकाचवेळी ५ दिवाळी अंक प्रकाशित होणार !**
**मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष, बोलका अंक. याशिवाय छापील चारही अंकांची एकत्रित सीडी उपलब्ध !**
**महाराष्ट्र–गोवा मिळून ३० हजारांहून अधिक अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी !!**

## छात्र प्रबोधनच्या आगामी दिवाळी अंकाच्या अंतरंगात डोकावताना

- रंगतदार, खुमासदार कथा, कविता, ललित लेख यांचा खजिना
  डॉ. जयंत नारळीकर, भारत सासणे, मीना वांगीकर, सदानंद देशमुख, माधुरी पुरंदरे, आश्लेषा महाजन, रा. ग. जाधव, रेणू पाचपोर, डॉ. स्वर्णलता भिशीकर, डॉ. मंगला नारळीकर इ.मान्यवरांचा सहभाग
- गणित वर्ष, स्वामी विवेकानंदांचे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्ष या निमित्ताने विशेष लेख
- निर्णयक्षमता ही विचारप्रक्रिया स्पष्ट व्हावी आणि वाढावी यासाठी या विषयासंदर्भातील लेखनाचा खास स्वतंत्र विभाग
- ‘आम्ही लिहिणार आमची पाने’ या सदरात विद्यार्थ्यांचे खास लेख
- याशिवाय माहितीपर लेख, गंमतदार कोडी, विज्ञान प्रयोग, कलाकौशल्य, विनोद, भाषेच्या गमती–जमती आणि बरेच काही.

---

**‘तुम्हीच संपादक व्हा!’ ही राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा यावर्षी घेण्यात येणार आहे.**
**५ जानेवारीपर्यंत २०१२ पर्यंत नोंदणी करावी. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घ्यावा.**
*(तपशील चालू अंकात आणि दिवाळी अंकात वाचा. )*

# छात्र प्रबोधन

**सौर आश्विन, शके १९३४। वर्ष १३ अंक १**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २४३ वा अंक, वर्ष २१ अंक ३

प्रकाशन दिनांक - ९ आश्विन, शके १९३४/१ ऑक्टोबर २०१२


ॐ

**इवली शल्ये रुपती खुपती**
**मात करू दे त्यांच्यावरती**
**प्रगल्भतेचे पंख देऊनी**
**ने ज्योतिर्जगतात**

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| २. | **संवाद** | - महेन्द्र सेठिया |
| ३. | कथा... **हात मोडला म्हणून...** | - डॉ. सुमन नवलकर |
| ७. | आपल्या आसपास... **'घुसखोरी'ने अस्वस्थ आसाम** | - प्रा. प्रशांत दिवेकर |
| ११. | व्यक्तिपरिचय... **'कलेची नजर असणारी' समीना शेख** | - मीरा बडवे |
| १४. | चित्रगोष्टी - ८ ... **संकल्पचित्र** | - चित्रा वैद्य |
| १६. | व्यक्तिपरिचय... **शुभ्र क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन** | - माधुरी बारपुते |
| १९. | **छात्र प्रबोधन दिवाळी अंक वितरण** | |
| २४. | **माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन** | |
| | **मलपृष्ठ पद्य : नरसखा तुम नरनारायण** | - स्वामी श्रीकांतानंद |

**याशिवाय -** दिनविशेष, मुखपृष्ठ चित्रकार परिचय (६), मलपृष्ठ पद्याचा अर्थ (९), हस्तलिखित स्पर्धा निवेदन, ओळखा पाहू मी कोण? (१०)


या अंकातील पानांखालील काव्यपंक्ती कवी श्रीनिवास शारंगपाणी यांच्या आहेत.

**मुखपृष्ठाविषयी –** जुन्या वास्तू या आपल्या संस्कृतीचा ठेवा आहेत. आपल्या परंपरा, वारसा आणि भूगोल यांचा जिवंत इतिहास आहेत. कलाकार म्हणून मला वास्तूतून स्रवणारं प्रेम आणि वात्सल्य जाणवतं, तडे गेलेल्या भिंतीतील वेदनाही माझ्यात झिरपतात. जुने वाडे, वास्तू यांची चित्रं घरात लावण्याची आपल्याकडे प्रथा नाही. ते अशुभही मानले जाते. पण आपल्या घरातला ज्येष्ठ माणूस; जो आपला आधारवड बनला, ज्याच्या सावलीत आपण निवांत अन् निश्चिंत झालो तो आज वृद्ध, जर्जर झाला म्हणून त्याला अशुभ समजायचं का? शिवरायांच्या पराक्रमाने पावन झालेले गड-किल्ले आज भग्न स्थितीत आहेत, त्यांना आपण अशुभ समजायचं का? आणि चित्रकाराने शुभ अशुभाच्या या खेळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य संकुचित करायचे का? या आणि अशा विचारांच्या कल्लोळातच हे चित्र पूर्ण झाले आहे. **– दीपक साळी**


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**अतिथी संपादक**
सुलभा कुलकर्णी

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन

**मुखपृष्ठ -** दीपक साळी
**आतील चित्रे -** अमोल भोसले

**वार्षिक वर्गणी : ₹ १८०**
**द्वैवार्षिक : ₹ ३४०**
**त्रैवार्षिक : ₹ ५००**
**दशवार्षिक : ₹ १,५००**

**या अंकाची किंमत : ₹ १५**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४० जादा



**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**

# संवाद

***उद्‌दिपूर्तीसाठी प्रयत्नशील असलेल्या प्रिय प्रबोधकांनो,***

*गणेशोत्सवाची धामधूम नुकतीच संपवून पुन्हा रोजचा दिनक्रम सुरू झाला असेल. शाळेतल्या अथवा आपल्या भागातल्या गणेशोत्सवात उत्साहाने सहभागी झालात ना? की निव्वळ बघ्याची भूमिका घेतलीत? पुढाकार घेऊन, जबाबदारी घेऊन, हिरीरीने, उत्साही वातावरणावर स्वार होणं हे 'छात्र प्रबोधन'च्या 'प्रबोधकां'चं खास वैशिष्ट्य असायला हवं, असं मनापासून वाटतं. तुम्ही त्यासाठी आवर्जून प्रयत्न करणार ना?*

*शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला किंवा नवीन वर्षारंभाला (गुढी पाडव्याला) किंवा आपल्या वाढदिवशी पुढील वर्षासाठी आपण काही संकल्प करतो, कोणती उद्‌दिष्टे गाठायची हे ठरवतो. (तुम्हीही ठरवता ना? की मौज मजा करत 'तो' दिवस घालवता?) थोडीशी आवाक्याबाहेरची असलेली काही उद्‌दिष्टे ठरवणं ही आयुष्यात यशस्वी होण्याची, काही मोठा पराक्रम करून दाखविण्याच्या वाटचालीतली पहिली महत्त्वाची पायरी आहे. पण उद्‌दिष्टे नुसती मांडून पुरत नाहीत, छोट-मोठे संकल्प नुसते करून ते आपोआप पूर्ण होणार नाहीत. तर त्यासाठी ठरवून प्रयत्न करावे लागतात. काय म्हणताय, 'म्हणजे काय करायचं?'*

*सगळ्यात पहिल्यांदा आपण केलेल्या संकल्पांची, ठरवलेल्या **उद्दिष्टांची वारंवार उजळणी करायची.** नाहीतर केलेले संकल्प केव्हाच हवेत विरून जातात. असं होऊ नये यासाठी आपल्या खोलीत/अभ्यासाच्या ठिकाणी/दैनंदिनीत ती उद्दिष्टे लिहून ठेवा, जेणे करून ती सतत नजरेसमोर येतील. आपल्या जवळच्या वाटणाऱ्या 'खास' व्यक्तींना आपली उद्दिष्टे आवर्जून सांगा व अधूनमधून त्यांना त्याबाबत आठवण करायला सांगा.*

*आपणच ठरवलेल्या **उद्‌दिष्टांची मग छोट्या-छोट्या कृतींमध्ये फोड करा.** उदा. यावर्षी माझे हस्ताक्षर मी सुधारणार/वक्तृत्व स्पर्धेत मी क्रमांक मिळवणार/या वर्षात १००० पानांचे अवांतर वाचन करणार/सायकलवर १०० कि.मी. अंतर पार करणार/अभ्यासात १० टक्क्यांची प्रगती करणार/ ५ झाडे लावून ती जगवणार/५ गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करणार यांसारखी उद्‌दिष्टे तुम्ही ठरवली असलीत तर यातलं कोणतंही उद्‌दिष्टं एका दिवसात पूर्ण होणार नाही हे तुम्हालाही माहीत आहे. म्हणून मग त्यासाठी काय-काय करायला हवं, काय-काय केलं म्हणजे तुम्ही ते उद्‌दिष्ट पूर्ण करू शकाल? त्याची यादी करायला घ्या. हस्ताक्षर सुधारायचे तर चांगल्या हस्ताक्षरांचे नमुने गोळा करणे, हस्ताक्षर सुधारण्याचे तंत्र सांगणारे पुस्तक मिळवणे, चांगलं हस्ताक्षर असलेल्या व्यक्तीकडून हस्ताक्षर सुधारायचे धडे घेणे, हस्ताक्षर सुधारण्यासाठी समजून-उमजून सराव करणे, आपल्या हस्ताक्षरातल्या चुका समजून घेऊन त्या दुरुस्त करणे. इ. गोष्टी तुम्ही केल्यात की तुमचे हस्ताक्षर नक्कीच सुधारेल. मग आता तुम्ही ठरवलेल्या उद्‌दिष्टांसाठीही छोट्या-छोट्या कृती लिहून काढा बरं! अनेकवेळा उद्‌दिष्ट ठरवताना मोठा उत्साह असतो पण ती ठरवल्यानंतर प्रत्यक्ष काय कृती करायची हे ठरलेलं नसतं. आणि म्हणून मग उद्दिष्ट अनेकवेळा कागदावर किंवा मनातच राहातं.*

*एकदा **काय-काय करायचं ठरलं की मग केव्हा-केव्हा करायचं हेही ठरवावं लागतं.** कोणत्या महिन्यात/आठवड्यात/दिवसातल्या कोणत्या वेळात ते करायचं हे ठरवलं म्हणजे मग उद्‌दिष्टपूर्तीच्या दिशेने वाटचाल करायची तयारी छान झाली असं म्हणायला हरकत नाही. **आता त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणं हे सर्वात महत्त्वाचं!** कंटाळा, आळस, 'उद्यापासून सुरू करू' म्हणत सुरुवात करायलाच उशीर करणं, काही अडथळे आलेच तर त्यांनी थबकून जाणं, 'आपल्याला जमणार नाही' असं म्हणत झटकन माघार घेणं, मूड नसणं अशा गोष्टींवर मात करणं जमायला हवं. रोज आवश्यकतेनुसार स्वत:त बदल करत जायला हवेत. निदान ५ मिनिटे तरी स्वस्थ, शांत बसून ठरवलेल्या गोष्टींचा आढावा घ्यायला हवा. मला खात्री आहे अशा काही पायऱ्यांवरून तुम्ही वाटचाल केली तर **तुमची उद्‌दिष्टे तुम्ही नक्कीच पूर्ण करू शकाल!***

*यावर्षी दसऱ्याच्या निमित्ताने आपणच ठरवलेल्या उद्‌दिष्टांचा (ठरवली नसल्यास दसऱ्याचा मुहूर्त उत्तम!) डोळसपणे पाठपुरावा करूयात. मोठ्या विजयाची घोडदौड करायला, छोट्या-मोठ्या सीमा उल्लंघून, अडथळे पार करायला अन् मर्यादांनी मर्यादून न जाता पराक्रमाची तोरणं बांधायला सज्ज होऊया. खूप खूप शुभेच्छा!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



आनंदाचं फुलझाड आपणच आपल्या अंगणात लावायचं ।
येणाऱ्या प्रत्येक दिवशी आपलं आपणच दरवळायचं ।।
**प्रायोजक – शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका**

# हात मोडला म्हणून...

डॉ. सुमन नवलकर



सहामाही परीक्षा संपल्यामुळे मुलं मोकाट सुटली होती. समोरच्या सायकलवाल्याकडून भाड्याने सायकल आणायची आणि कॉलनीतल्या बागेभोवती फेऱ्या मार-मार मारायच्या. सलिलची आई तशी शिस्तीची आहे. दुपारी उन्हात ती नाही म्हणजे नाहीच देत सायकल चालवायला परवानगी. खरं तर सकाळी घराबाहेर भटकायलाही नाही सोडत. संध्याकाळी काय ते खेळा. सकाळी खेळायचं ते घरातल्या घरात. कॅरम, पत्ते, साप-शिडी, ल्युडो खेळा, पुस्तकं वाचा. पण घराबाहेर जायचं नाही.

पण झालं असं की, मुलांना सुट्टीत येता-जाता भूक लागते म्हणून आईने आदल्या दिवशीच लाडू आणि चिवडा केला होता. तो तिला त्याच कॉलनीत राहणाऱ्या तिच्या बहिणीकडे पोहोचवायचा होता. आईने दिलेली पिशवी मावशीकडे पोहोचवून सलील बागेत थोडा वेळ रेंगाळलाच.

''एक फेरी दे रे गोट्या,'' सलिलला राहावेचना.

''संध्याकाळी तू आणशील सायकल तेव्हा दोन फेऱ्या द्याव्या लागतील.'' गोट्याने अट घातली. एका फेरीच्या बदल्यात दोन फेऱ्या, हा सौदा सलिलला खरंतर मुळीच पचला नव्हता. पण आता एक फेरी मारायचा मोहही आवरत नव्हता. शिवाय छोटू-गोटू अतिशय वेगाने चालवतात सायकल. पापण्यांची उघडझाप होईपर्यंत होऊनच जाते त्यांची फेरी. सलिलने 'हो' म्हटलं आणि डाव्या पायाने डाव्या पॅडलवर पाय मारता-मारता पट्कन सीटच्या वरून उजवी टांग उजव्या पॅडलवर टाकली. हां-हां म्हणता फेरी पुरीही झाली. पण उतरायला जाणार तेवढ्यात मनजीतची सायकल पुढ्यात आल्याने बाजूच्या इमारतीच्या भिंतीचा आधार घेत सलील उतरायला गेला. भिंतीवरून हात घसरला आणि उजव्या हातावरच पडली स्वारी. शिवाय सायकलही पडली अंगावर. सगळा भार उजव्या हातावर पडला आणि मनगटापाशीचं हाडच मोडलं. हाताचा पंजा लोंबकळायलाच लागला.

हाड नीट जुळवून, भक्कम प्लॅस्टर घालून आणि हात सलिलच्या गळ्यात अडकवूनच डॉक्टरांनी त्याला घरी पाठवलं. तब्बल तीन आठवड्यांनी बोलावलं होतं परत. शिवाय हातही उजवाच.

सलील अगदी रंजीस आला. सुट्टी वाया जाणार म्हणजे काय? शिवाय घरबसल्या पत्ते खेळावे म्हटलं तरी त्यालाही दोन हात लागतातच. कॅरम पण डाव्या हाताने कसा खेळायचा? पुस्तकं तरी किती वाचणार? शिवाय ते प्लॅस्टर सांभाळत लोळता पण येत नव्हतं नीट. पुस्तक धरायचं कसं? पान उलटायचं कसं? आणि पंख्याखाली बसलं तर पुस्तकाची उडणारी पानं सावरायची कशी? अगदी 'रनर' घेऊन क्रिकेट खेळण्यापेक्षाही कठीण परिस्थिती. जेवण-खाणही नको वाटायला लागलं डाव्या हाताने. शिवाय उकाड्याचे दिवस. प्लॅस्टरच्या आत घाम येऊन-येऊन खाज यायला लागली. फटीतून पावडर टाकली तरी खाज थांबेना. शेवटी आईने तिची वीणकामाची सुई अलगद प्लॅस्टरच्या फटीत वरवर फिरवली. भीतभीतच. नाही

या जगतामधली नाती कधि उमलून येती,सरती ।
चंद्र-सागरामधली जशि ओहोटी अन् भरती ।।
प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव



म्हणायला सखीचा - त्याच्या बहिणीचा भाव वाढला. इतके दिवस सलील तिच्यावर दादागिरी करायचा. आता सखी त्याच्यावर ताईगिरी करायला लागली. सलिलला ऊठ-सूट गरज भासायला लागली ना तिची ! बाहेरगावी जायचं तर सोडाच, पण सुट्टी असून मुंबईतल्या मुंबईत फिरायला जाणं पण अशक्य होऊन बसलं. जाम वैतागला सलील.

नाही म्हणायला आई-बाबा जरा जास्तच प्रेमाने वागत होते. आरडा-ओरडा करत नव्हते. पण खेळायला न मिळण्यापेक्षा त्यांचं ओरडणं परवडलं असतं.

याच दिवसांत कधीतरी सलिलला बुद्धिबळाचा छंद लागला. आईला आणि सखीला बुद्धिबळाचा डाव शिकवायचा. बाबांना त्यात हरवणं कठीणच. पण तासन्तास चालणाऱ्या त्या खेळात हाताच्या प्लॅस्टरचा, त्यात सुटणाऱ्या खाजेचा थोडा तरी विसर पडायचा. सुट्टीच्या दिवशी तर अख्खा वेळ बुद्धिबळच!

पण बाबा येईपर्यंत करणार तरी काय? टी.व्ही. तरी किती पाहणार? एरव्ही सलिलला टी.व्ही पाहायला खूप आवडतो. पण आता अगदी सिनेमाची सी.डी. आणून लावली तरी नको वाटायला लागली. एका जागी बसायचं, तेही न हलता, म्हणजे शिक्षाच वाटायला लागली. आधीच प्लॅस्टरमुळे जड झालेला हात मणा-मणाचा वाटायला लागला होता. त्यातून तो गळ्यात अडकवल्यामुळे मानही दुखायला लागल्यासारखी वाटायला लागली, त्यातून टी.व्ही. वरची माणसं इतक्या सहजपणे हालचाली करतायत, उड्या मारतायत, नाचतायत, गाणी म्हणतायत आणि आपण हे सगळं न हलता पाहायचं म्हटल्यावर सलिलला आपलं हलू न शकणं जास्तच शिक्षेसारखं वाटायला लागलं. त्यामानाने कानात हेडफोन अडकवून गाणी ऐकणं जास्त बरं वाटायला लागलं. कारण गाणारी माणसं हात हलवताना दिसत नव्हती ना !

तेवढ्यातच केव्हातरी सलिलला वाटलं की, आपण गाणं शिकलो, तर या हाताचा त्रास कमी झाल्यासारखा वाटेल. पण या मोडक्या हाताने गाण्याच्या क्लासला कोण पाठवणार? आई तर त्याला संध्याकाळी दुसरी मुलं कशी खेळतात ते पाहायलाही पाठवेनाशी झाली होती. मग सलिलने आपलं आपणच गायला सुरुवात केली. असंही गाणं ऐकायला, गुणगुणायला त्याला आवडायचं. पण आता तो तासन्तास कानाला हेडफोन लावून गाऊ लागला. गाऊन गाऊन घसा दुखायला लागेपर्यंत त्याची ही गाण्याची तालीम चालायची.

तीन आठवडे संपता-संपता शाळाही सुरू होणार होती. आता या अवतारात शाळेत कसं जायचं हाही सलिलला प्रश्नच पडला होता. हाड जुळल्यानंतरही काही दिवस गुलाबी बँडेज हाताला लावावंच लागणार होतं. पण तीन आठवड्यांनंतर सलील डॉक्टरांकडे गेला तेव्हा हाड अजून पूर्णपणे जुळून न आल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं. मग काय? आणखी तीन आठवडे हात प्लॅस्टरमध्येच ठेवायचं ठरलं. सलील रडकुंडीला आला. उजवा हात प्लॅस्टरमध्ये असताना तो शाळेत जाऊन करणार काय?

शाळा सुरू व्हायला अजून पाच-सहा दिवस होते. मग सलिलने डाव्या हातात पेन धरून लिहायला सुरुवात केली. अगदी पहिल्या दिवशी दगडी पेन्सिल हातात धरून 'गमभन' गिरवणाऱ्या लहानशा मुलासारखं वाटलं त्याला.

हातातून पेन निसटायला लागलं. कोंबडीच्या पायासारखी अक्षरं यायला लागली. तसं तर सलिलचं अक्षर अतिशय सुंदर. अगदी छापल्यासारखं. पण डाव्या हाताने त्यानं लिहिलेली अक्षरं पाहून सलील अगदीच रडवेला झाला. त्यातून डाव्या हाताने लिहायला लागलं तरी कागद आणि डावा हात यांच्यामध्ये



। अभिनंदन... चित्रपट अभिनेते दिलीप प्रभावळकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ अनिल अवचट 'बाल साहित्य भूषण पुरस्कार' ।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

प्लॅस्टरसकटची उजव्या हाताची घडी येतच होती. मग सलिलने व्यवस्थित जेवणाच्या टेबलावर वही मांडली. टेबलापाशी खुर्ची नीट सरकवली. आणि नीट बसून लिहायला सुरुवात केली. आई स्वयंपाक करता-करता सलिलचा आटापिटा पाहत होती, पण काही न बोलता. उगीच त्याच्या प्रयत्नांमध्ये, उसन्या उत्साहामध्ये काही बिनसायला नको.

आईचा स्वयंपाक होऊन आवरा-आवर झाली तरी सलिलचे डाव्या हाताने लिहायचे प्रयत्न चालूच होते. संध्याकाळी बाबा आल्यावरही त्याला बुद्धिबळ खेळायची आठवण झाली नाही. चार-पाच दिवसांत सलील डाव्या हाताने बऱ्यापैकी लिहायला लागला. शाळा सुरू झाली. एका हातात शर्ट अडकावून, प्लॅस्टरवाला दुसरा हात शर्टाच्या आतच ठेवून 'शोले' सिनेमातल्या ठाकूरसारखा सलील शाळेत जाऊ लागला. मस्ती करणं नाही, बाकांवरून उड्या मारणं नाही. मधल्या सुट्टीत मैदानात जाऊन हैदोस घालणं नाही. अगदी डबा उघडण्यासाठी पण सलिलला कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती.

नाही म्हणायला सलील निबंध लिहीत होता, गणितं सोडवत होता. चित्रकलेच्या तासाला चक्क चित्रंही काढत होता. सगळं काही डाव्या हाताने. प्लॅस्टरमधला उजवा हात हे सर्व हिरमुसला होऊन पाहत होता. आपलं महत्त्व आता कायमचंच कमी होतं की काय, असं त्याला वाटायला लागलं होतं.

तीन आठवड्यांनी हाताचं प्लॅस्टर निघालं. पण हातात जोर नव्हता. सहा आठवडे प्लॅस्टरच्या आत झोपून राहिल्यामुळे हात सुस्तावला होता. हडकुळाही झाला होता. हाताची कातडीही सुरकुतल्यासारखी झाली होती. मग क्रीम, तेल लावून-लावून हळू-हळू कातडी सुधारली. थोड्या हालचालींनी हातात हळू-हळू जोर आला. पण या सर्व प्रकारात डाव्या हाताने आपलं काम चोख बजावलं होतं.

शाळा सुरू झाल्यानंतर महिन्याभरातच निरनिराळ्या आंतरशालेय स्पर्धा सुरू झाल्या. गाण्याच्या स्पर्धेविषयीची नोटीस आल्यानंतर बाईंनी नेहमीप्रमाणे कुणाल आणि सायलीची नावं दिली.

''आणखी कोणाला नाव द्यायचंय का?'' बाईंनी आपलं असंच विचारलं.

सलिलने आपला डावा हात वर केला. उजवा हात अजूनही जरा बिचकल्यासारखाच वागायचा. पटकन हलायचाच नाही. सगळे चकित होऊन पाहायला लागले. अगदी बाईदेखील. 'हा कधीपासून गायला लागला बुवा?'

मग बाईंनी त्याचं नाव स्पर्धेसाठी देण्यापूर्वी त्याला गाऊन दाखवायला सांगितलं, ''छोडो कलकी बातें, कलकी बात पुरानी''




सलिलनं गाणं गायला सुरुवात केली. अख्खा वर्ग शांत झाला. सगळेच भारावून गेले. सलिलच्या शेजारी बसणारा आकाशही चकित झाला. 'अरे! याच्या शेजारी बसूनही हा गातो हे आपल्याला कसं माहीत नाही?'

गाणं संपलं तेव्हा अख्खा वर्ग सलिलबरोबर गात होता, ''हम हिन्दुस्थानी, हम हिन्दुस्थानी!''

''या वर्षी आपलं काही खरं नाही'' कुणाल सायलीला म्हणाला. सायलीने नुसतीच मान डोलावली.

डिसेंबर महिन्यात बुद्धिबळ स्पर्धेची नोटीस आली तेव्हाही सलिलने आपलं नाव दिलं. मुलांना पाठवण्यापूर्वी मालशेसरांनी मुलांची सराव-स्पर्धा घेतली. सलिलचा खेळ पाहून मालशेसरही चकित झाले. या वर्षी बुद्धिबळ स्पर्धेची ढाल सलिलच्या शाळेलाच मिळाली.

हां-हां म्हणता वर्ष संपत आलं, वार्षिक परीक्षा जवळ आल्या. मुलं इतर गोष्टी बाजूला ठेवून अभ्यासाला लागली.

''भाषेचे पेपर भरभर लिहा मुलांनो, निबंध, पत्र, मोठी-मोठी

मी गोष्ट सांगतो मित्रा जणू सर्कस आणिक जत्रा ।
ही अपुली जीवन यात्रा कधि वेलांटी कधि मात्रा ।।
प्रायोजक – श्री. अमर परांजपे, सांगली

उत्तरं लिहिताना वेळ संपतो. एखाद्या प्रश्नाचं उत्तर लिहायचं राहूनच जातं. अशाने गुण कमी मिळतात. म्हणून भरभर लिहायची सवय करा.'' बाई पुन्हा-पुन्हा सांगत.

''माझा तर हातच दुखायला लागतो'' प्रिया म्हणाली.

''आणि माझं ना हे मधलं बोट वाकडंच होतं, पेन धरून-धरून' हर्षनेही तक्रारीचा सूर लावला. मनातून सगळेच हबकले होते. एकटा सलील तेवढा शांत होता. त्याचे काय, दोन्ही हात लिहितात ना हल्ली!

'उजवा हात दुखायला लागला की डाव्याने लिहायचं. डावा दुखायला लागला की उजव्याने लिहायचं. सोप्पयं!, त्याने मनाशीच म्हटलं आणि तो अभ्यासाला लागला.

***

**डॉ. सुमन नवलकर**
ए / २० ज्योती बिल्डिंग,
प्लॉट नं. ४३ / ४५,
बरकत अली दर्गा मार्ग,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०००३७

दिनविशेष

**आक्टोबर पहिला सोमवार**
**जागतिक आधिवास (मूलस्थान) दिन**



१९८६ मध्ये युनायटेड नेशन्सने प्रथम 'जागतिक आधिवास (मूलस्थान) दिन' World Habitat Day साजरा केला. अधिवास नष्ट झाला किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर असेल तर त्या सजीवाचं/जातीचं अस्तित्व नष्ट होऊ शकतं. उदाहरणार्थ :- वाघाचं आधिवास असलेली जंगलं नष्ट होत असल्यामुळे त्याची संख्या हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे निसर्गातले वेगवेगळे आधिवास जपणं गरजेचं आहे.

तुम्ही काय कराल?

• तुमच्या आजूबाजूला कोणत्या वनस्पती, प्राणी आहेत; त्यांची वसतीस्थानं कुठे आहेत (उदा. जलपर्णी पाण्यातच वाढते, तर वडाचं झाड जमिनीवर) त्याची यादी करा. • काही प्राणी, वनस्पती, सूक्ष्म जीव गोड्या पाण्यात / साध्या पाण्यात तर काही फक्त खाऱ्या पाण्यातच सापडतात त्यांची यादी करा. • वैशिष्ट्यपूर्ण प्राणी, वनस्पती फक्त तिथेच का वाढत असतील ह्याचा विचार करा, कारणं शोधून काढा. त्यांच्यात इतरांपेक्षा काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत का ह्याची माहिती मिळवा. • जर आधिवास नष्ट झाले तर काय होईल? तुमच्या घराजवळच्या एखाद्या मोठ्या झाडावर कुठल्या पक्ष्याचं घरटं असेल आणि ते झाड पडलं / तोडलं तर तो पक्षी कुठे जातो, तो पुन: पुन्हा तिथे घिरट्या घालतो का? हे ही निरीक्षण करा.

डॉ. कांचनगंगा गंधे, kanchan.gandhe@gmail.com

## मुखपृष्ठ चित्रकार



नाव : दीपक साळी
जन्म : १८ /७ / १९६१
शैक्षणिक पात्रता : जी. डी. आर्टस् (अभिनव कला विद्यालय)
बी. एफ. ए. (जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मुंबई), एम. ए. सौंदर्यशास्त्र (मुंबई विद्यापीठ)

अनेक नामांकित जाहिरात संस्थांमध्ये क्रिएटिव्ह आर्टिस्ट व व्हिजुअलायजर म्हणून काम केले आहे. सकाळ चतुरा, लोकसत्ता, इंडियन एक्स्प्रेस, सामना इ. दैनिकांमधील तर बालभारती - किशोर, सत्याग्रही, श्री आणि सौ. इ. मासिक व प्रकाशन संस्थांमध्ये रेखाचित्रकार म्हणून काम. त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी वैयक्तिक व सांघिक प्रदर्शने आर्ट गॅलरीतून भरवली गेली आहेत.


रंगब्रश, कागद, कॅनव्हास, पुस्तके व लेखणी यांच्या सहवासात सतत राहाण्याचा त्यांचा मानस आहे.



। दिनविशेष... १ ऑक्टोबर - जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन ।

प्रायोजक - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

*आसामधील बोडो मुस्लिम संघर्ष, स्वकीय आणि परकीय यातील भेद विचारात न घेता ११ ऑगस्ट रोजी झालेली मुंबईतील हिंसक निदर्शने आणि पाठोपाठ पुण्यात इशान्य भारतातून आलेल्या विद्यार्थ्यांवर झालेला हल्ला यानंतर बांगलादेशी घुसखोरीचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर आला. या प्रश्नाला राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक असे विविध पदर आहेत. आपल्या देशातील बांधवांचे प्रश्न सहानुभूतीने जाणून घेऊन आपणही त्यांच्याशी जवळीक साधायला हवी. अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने मे २०१२ मध्ये प्रा. प्रशांत दिवेकर यांनी ज्ञान प्रबोधिनीतील युवक-युवती गटासोबत आसामला भेट दिली. आसामचे प्रश्न जाणून घेऊया त्यांच्या शब्दात !*




# 'घुसखोरी'ने अस्वस्थ आसाम

- प्रशांत दिवेकर

मे महिन्यात ज्ञान प्रबोधिनीतील युवक-युवती गटासोबत आसाम, अरुणाचल प्रदेशच्या दौऱ्याला गेलो होतो. ईशान्य भारतातील समृद्ध निसर्ग व त्याच्या सान्निध्यात विकसित झालेल्या वनवासी संस्कृतीचा परिचय करून घेणे हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता. दौऱ्याच्या वेळी आम्ही आसाम मधील चहाच्या मळ्यांना भेटी दिल्या आणि चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी 'आनंद मेळावे' घेतले. मी दिब्रुगड जवळील मोरान चहाच्या मळ्याला भेट दिली. मेळाव्यानंतर सावरालेन वस्तीतील लोकांशी गप्पा मारताना ते ओरिसा, छोटा नागपूर भागातून कामासाठी आसाममध्ये कसे स्थलांतरित झाले त्याची माहिती सांगितली. त्यांचे पणजोबा चहाच्या मळ्यात काम करण्यासाठी आसाममध्ये स्थलांतरित झाले. ब्रिटिशांनी आसाममध्ये चहाच्या मळ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर मजूर ओरिसा, छोटा नागपूर भागातून आणले. तसेच राज्य व्यवस्थेसाठी बंगाली मोठ्या प्रमाणात आसाममध्ये स्थिरावले. भारताची फाळणी झाली तेव्हा विस्थापित बंगाली जनता त्रिपुरा, आसाममध्ये स्थलांतरित झाली. भारताच्या इतिहासात स्थलांतर नेहमीच राष्ट्र जीवनावर परिणाम करणारे ठरले आहे. मोठ्या प्रमाणावर लोक एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात राहण्यास आले तर तेथील लोकजीवनावर त्याचा परिणाम होतो.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पूर्व पाकिस्तानला पश्चिम पाकिस्तानकडून वेगळी वागणूक मिळत होती. त्यामुळे अनेक निर्वासित भारतात राहण्यास आले. त्यांनी भारताची परवानगी न घेता भारतात प्रवेश केला. अशा आश्रितांच्या लोकसंख्येचा दबाव भारतावर वाढत राहिला. पुढे बांगलादेशचा स्वातंत्र्यलढा उभा राहिला व पूर्व पाकिस्तानने भारताच्या मदतीने स्वातंत्र्य मिळविले. भारतात आश्रयाला आलेले मात्र कधीच परत गेले नाहीत.

भारताच्या एका राज्यातील नागरिक कधीही दुसऱ्या राज्यात राहण्यासाठी जाऊ शकतो. लोकसंख्येच्या अशा स्थानांतराला **स्थलांतर** म्हणतात. पण एखाद्या देशात तुम्ही त्या देशाची परवानगी न घेता, अवैध मार्गाने प्रवेश केला व तिथे राहू लागलात तर त्याला **घुसखोरी** म्हणतात.

आसाम आणि ईशान्य भारतातील राज्ये भारताच्या मोठ्या भूभागाशी एका अरुंद चिंचोळ्या भूभागाने जोडली आहेत. भूतान आणि बांगलादेश मधील या चिंचोळ्या पट्टीला 'सिलिगुडी कॉरिडोर' किंवा 'चीकन नेक' म्हणून ओळखतात. भारत आणि आपला शेजारी बांगलादेश यामधील सीमा भौगोलिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. गंगा, ब्रह्मपुत्रेच्या पाण्याच्या प्रवाहांनी तिला सच्छिद्र केले आहे.

जीवनाच्या गाडीमधले आपण असतो यात्री ।
कुठे थांबुनी उतरायचे याची नसते खात्री
**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, नॉटिंगहॅम, इंग्लंड**



अभ्यास दौऱ्याच्या वेळी आसाम आणि अरुणाचलमधील महाविद्यालयीन युवक - युवतींशी गप्पा झाल्या. सांस्कृतिक जीवन जाणून घेण्याबरोबर त्यांच्या इच्छा-आकांक्षा जाणणे हा उद्देश होता. बंद, दहशतवादी कारवाया अशा अस्थिर, असुरक्षित वातावरणाने ईशान्य भारतात नियमितपणे अध्यापन होत नाही, परीक्षा वेळेवर होत नाहीत, झाल्या तर निर्णय वेळेवर लागत नाहीत, त्यामुळे अनेक युवक - युवतींचे पुणे, बंगलोर, दिल्ली येथे जाऊन उच्चशिक्षण घेण्याचे स्वप्न असते. उत्तम गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षण प्राप्त करण्याचे स्वप्न घेऊन महाराष्ट्रातील अनेक गावांत ईशान्य भारतातून विद्यार्थी आले आहेत. शांत सुरक्षित वातावरण, उत्तम शिक्षणाची संधी यामुळे महाराष्ट्राबद्दल ईशान्य भारतातील नागरिकांमध्ये एक विश्वासाचे स्थान आहे. ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांनी परत जाऊ नये म्हणून महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्थांनी जी मदत केंद्रे सुरू केली आहेत, त्यातून देशातील नागरिकांचा एकमेकांबद्दल असलेला जिव्हाळा, आपलेपणा व राष्ट्रीयत्व व्यक्त होत आहे. याच देशबांधवांमधील जिव्हाळ्यातून, आपलेपणामधून भारतीयत्व दृढ होत जाईल व सध्या निर्माण झालेली अस्वस्थता दूर होईल.

त्यामुळे सीमा ठरविणे आणि तिला कुंपण घालणे अवघड आहे. बांगलादेशमधील दारिद्र्य, अस्थिर राजकीय परिस्थिती यामुळे देश सोडून भारतात प्रवेश करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सीमेवरील आसाममधील धुबडी, कोकराझार, बोंगाईगाव, बारपेटा, गोलपारा या जिल्ह्यात घुसखोरांची संख्या मोठी आहे. हीच परिस्थिती सिलचर परिसरातील जिल्हे, त्रिपुरा आणि मेघालयात आहे.

आसाममध्ये फिरत असताना ठळकपणे नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे बांगलादेशींचे अस्तित्व. प्रत्येक भागात उठून दिसणाऱ्या वस्त्या, त्यामध्ये राहाणारे अल्प मोबदल्यात काम करण्यासाठी उपलब्ध होणारे मजूर. अशा वस्त्यांमध्ये जपला जात असलेला मूलतत्त्ववाद आणि निर्माण केली जात असलेली राष्ट्रविरोधी भावना हा गंभीर मुद्दा आहे. २००५ मध्ये आसामचे राज्यपाल ले. ज. अजयसिंग यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाला सादर केलेल्या अहवालात दिवसाला ६००० लोक बेकायदेशीरपणे बांगलादेशातून भारतात प्रवेश करतात असे म्हटले आहे. १४ जुलै २००४ रोजी संसदेत गृहखात्याच्या राज्यमंत्र्यांनी निवेदन करताना देशात १,२०,५३,९५० अनधिकृत बांगलादेशी स्थलांतर करून राहातात त्यांपैकी ५०,००,००० लोक आसाममध्ये आहेत, अशी आकडेवारी मांडली आहे. सरकारी आकडा एवढा असेल तर प्रत्यक्षात संख्या किती असेल!

भारतात बेकायदेशीर प्रवेश करणे, खोटी कागदपत्रे तयार करणे आणि रेशनकार्ड, भारतीय नागरिकत्व मिळवून राजकीय दबाव गट निर्माण करणे, स्थानिक संसाधनांवर हक्क सांगणे, स्थानिक लोकांवर हिंसक हल्ले करून तणाव निर्माण करणे याचा परिणाम म्हणून विविध जनजातीत व समाज गटात वैमनस्य वाढत आहे. अशांतता निर्माण करणारे फुटिरतावादी गट समाजात मोठ्या संख्येने वाढत आहेत.

आसामला चार दशकांचा वांशिक, धार्मिक आणि प्रादेशिक अस्थिरतेचा इतिहास आहे. बोडो-आसामी, आसामी-संथाळ, दिमासा-करबी संघर्ष आहेत. सत्तरच्या दशकातील आसूचे आंदोलन, उल्फा आणि सध्या महत्त्वाची ठरलेली बोडो भागातील समस्या, निर्वासितांच्या भारतातील स्थानावर प्रश्न निर्माण करणारी आहे. जनगणनेचा अभ्यास केला तर आसामच्या सीमावर्ती जिल्ह्यातील लोकसंख्येच्या वाढीचा दर चिंताजनक आहे. मतांच्या राजकारणासाठी या घुसखोरीकडे दुर्लक्ष केले जात आहे किंबहुना अशा गोष्टी घडाव्यात यासाठी सुप्त राजकीय वरदहस्त आहे.

आसाममध्ये धुबडी, कोकराझार, बोंगाईगाव, बारपेटा, गोलपारा या जिल्ह्यात बोडो जनजातीचे लोक राहतात. बांगलादेशी घुसखोरांनी जमिनीवर कब्जा केल्याने आणि लोकसंख्येचे संतुलन बिघडल्याने स्थानिक संसाधनावर ताण येतो आणि संतुलन बिघडते. एक दिवस परकीय घुसखोर बहुसंख्य होऊन आपली हकालपट्टी करतील



। आदरांजली... चांद्रवीर नील आर्मस्ट्राँग - २६ ऑगस्ट २०१२ ।

। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला ! । **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

आणि सत्ताधारी होतील अशी भीती बोडो आणि आसाममधील जनतेच्या मनात निर्माण झाली आहे.

स्थलांतरित लोकांच्या वस्त्या देशविघातक कारवायांचे उगमस्थान आहेत. चार वर्षांपूर्वी जेव्हा बोडो भागात बोडो - मुस्लिम संघर्ष झाला होता, तेव्हा स्थलांतरितांच्या वस्त्यांमध्ये पाकिस्तानचे झेंडे लागले व तेच झेंडे संघर्ष सुरू होण्यास कारणीभूत ठरले होते. जुलैमध्ये घुसखोर मुसलमान आणि बोडो जनतेत संघर्ष सुरू झाला. ज्या घरात १० जण राहू शकतात अशा ठिकाणी १०० जण राहू लागले. तर राहाण्यासाठीची जागा, अन्नधान्य, नोकऱ्या अशासाठी संघर्ष होणारच. कोकराझार मध्ये हिंसक घटनांना वेळच्यावेळी पायबंद घालण्यास सरकारची दिरंगाई आणि बांगलादेशी घुसखोरांना पाठीशी घालण्याचे धोरण कारणीभूत आहे.

आसाम करार, आयएमडीटी कायदा, नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझनसारखे प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. कामाचा परवाना, दुय्यम नागरिकत्वासारखा काहीतरी राजकीय पर्याय शोधावा लागेल; कारण एवढी मोठी लोकसंख्या परत पाठवणे शक्य नाही.



आसाम मधील बोडो मुस्लीम संघर्ष, स्वकीय आणि परकीय यातील भेद विचारात न घेता झालेली ११ ऑगस्टची मुंबईतील हिंसक निदर्शने आणि पाठोपाठ पुण्यात विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्यानंतर बांगलादेशी घुसखोरीचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आला. ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याने देशांतर्गत नागरिकांची सुरक्षा कशी करणार? याचा विचार करावा लागेल.

बिहारी हटाव आणि बांगलादेशी हटाव यातील फरक विद्यार्थी म्हणून आपण लक्षात घेऊया. देशांतर्गत स्थलांतर होणार आणि भारतातील कोणत्याही राज्यातील भारतीय नागरिक देशातील कोणत्याही राज्यात जाऊन स्थायिक होऊ शकतो. पण परकीय नागरिकांची देशातील घुसखोरी रोखणे राष्ट्रीय सुरक्षा आणि एकात्मतेसाठी महत्वाचे आहे.

तुम्ही ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांशी पत्रमैत्री करू इच्छित असला तर छत्र प्रबोधनशी संपर्क करा.

***

**प्रशांत दिवेकर**
शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी पुणे -३०

---

## मलपृष्ठ पद्य 'नरसखा तुम नरनारायण'चा अर्थ

स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतीच्या आनंदाचा त्याग करून 'जनसेवा हीच ईशसेवा' या भावनेने या देशातील स्त्री-पुरुष सर्वांची दु:ख दूर करण्यासाठी स्वामीजींनी आयुष्य वेचले. कवी श्रीकान्तानंद या पद्यातून हीच भावना व्यक्त करतात.

कवी म्हणतात, आपल्या समाजातील वाईट रुढी-परंपरा, कर्मकांडाचे स्तोम यापासून आपल्या समाजाला मुक्त करण्यासाठी तुम्ही आला आहात. समाजातील स्त्री-पुरुष भेद, जातीभेद दूर करून या देशात सर्वांनी समानतेच्या भावनेने राहावे यासाठी तुम्ही प्रयत्न करीत आहात. देऊळ, मंदिर, मशिद, चर्च इथेच केवळ देव वसत नाही तर तो सर्वांच्या हृदयात असतो, हे वेदांतात सांगितलेले तत्व समाजात पोहोचवण्यासाठी तुम्ही झटत आहात. समाजाला खऱ्या धर्माचे स्वरूप शिकविणाऱ्या स्वामीजींचा कवीने त्रिकालदर्शी, ब्रह्मर्षी असा गौरव केला आहे.

कुठूनि आलो कुठे चाललो मलाच माझे उमजत नाही ।
अज्ञाताचाहशोध कुठोनी सुरू करावाहसमजत नाही ॥
**प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे**

## ‘छात्र प्रबोधन’द्वारा आयोजित नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय स्पर्धा

# ‘तुम्हीच संपादक व्हा !’

## राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा (पृष्ठमर्यादा ४८ ते ५४)

दिवाळीच्या सुट्टीचा या स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी पुरेपूर वापर करता यावा म्हणून महिनाभर अगोदरच स्पर्धेचे नियोजन जाहीर करत आहोत. एकाच शाळेतील, अथवा वेगवेगळ्या शाळातील मित्रमैत्रिणींचा गट करून मोठ्यासंख्येने या स्पर्धेत भाग घ्या. आणि तुमच्यातल्या कल्पकतेला, लेखन, चित्रकला यांना व्यक्त होण्याची संधी द्या.

**स्पर्धेचा तपशील –** • स्पर्धा इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

- स्पर्धा सांघिक असून त्यासाठी ५ ते ८ जणांचा गट असावा.
- स्पर्धेत प्रवेश नि:शुल्क आहे. तथापि **३१ डिसेंबर २०१२** पर्यंत पत्राद्वारा/ई-मेलद्वारा नावनोंदणी आवश्यक आहे. नोंदणीपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- हस्तलिखितात प्रतिभाशाली लेखन, कल्पक विचार, कला, मुलाखत, वर्षविशेष, इत्यादी विषयांचे साहित्य असणे आवश्यक आहे. याबाबतचे सविस्तर तपशील व याविषयांसाठी उपयुक्त तंत्रे, छापील साहित्य सहभागी सदस्यांना ‘छात्र प्रबोधन’च्या संकेतस्थळावर पाहता येईल वा पोस्टाने पाठविले जाईल.
- याशिवाय अन्य कोणत्याही विषयावरील कोणत्याही प्रकारच्या साहित्याचा समावेश (कथा, कविता, ललितलेख, माहितीपर लेख, कोडी, विनोद, कलाकृती, पत्रलेखन, प्रवासवर्णन, पुस्तक-चित्रपट परिचय इ.) तुम्ही हस्तलिखितात करू शकाल. हस्तलिखिताला विषयांचे बंधन नाही. जास्तीत जास्त लेखन सहभागी विद्यार्थ्यांनी लिहिलेले असावे. त्यात आकर्षक चित्रांची जोड द्यावी. संकलित पाने १० पेक्षा जास्त नको.
- **बक्षिसे –** **प्रथम क्रमांक –** रु. १०००/- **द्वितीय क्रमांक –** रु. ८००/- **तृतीय क्रमांक –** रु. ६००/- **उत्तेजनार्थ तीन बक्षीसे प्रत्येकी –** रु. ३००/-

अधिक माहितीसाठी छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळाला (www.chhatraprabodhan.org) जरूर भेट द्या अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधा.

**विशेष संधी –** क्रमांक प्राप्त हस्तलिखितात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार कोणत्याही एका महिन्यातील ४ दिवस ‘छात्र प्रबोधन’ अंकाच्या संपादकीय कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळेल.

**हस्तलिखिते पाठविण्याचा अंतिम दिनांक – ५ फेब्रुवारी २०१३**

स्पर्धेचा निर्णय २५ मार्च २०१३ रोजी जाहीर होईल.

२

### ओळखा पाहू मी कोण?

जलीय मी
पोहत नाही, चालतो.
घसरत जातो
हळूहळू !

क्षणोक्षणी,
हरघडी,
बदलतो मी
मम कायेचा आकार !

भंजीत होतो
अन् देतो
दोन जुळ्यास जन्म की !
सांगताय नव्हं, **कोन हाय् मी?**

१. मागील अंकातील ‘मी कोण?’ – **फुलपाखरू** २.आदिजीव – अमिबा



। अभिनंदन... डॉ. टी. व्ही. रामकृष्णन - एच. के. फिरोदिया पुरस्कार
(पदार्थ विज्ञानातील मोलाच्या योगदानाबद्दल)
**प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**

सहा वर्षापूर्वी समीना 'निवांत' ला आली. आजही तो प्रसंग आठवला की हसू येतं. गोबऱ्या गालांची, कुरळ्या केसांची, मध्यम चणीची, देखणी समीना समोर उभी होती. एक डोळा पूर्ण मिटलेला तर दुसरा अर्धा उघडलेला होता. त्या डोळ्यात जाण मात्र अगदी कमी होती. अंधुकसं दिसत होतं. समीना खूप भेदरलेली होती. अंधशाळेतल्या समीना आणि लैलाच्या सर्वेसर्वा शुभदा फडके मॅडम या दोन्ही मुलींना माझ्याकडे घेऊन आल्या होत्या. समीना अंगठा दाबून जमीन कुरतडण्याचा प्रयत्न करत होती. खाली फरशी होती म्हणून बरं नाहीतर जमिनीला मोठ्ठा खड्डाच पडला असता. मी मात्र मनाशी हसत होते, म्हणत होते - ''बायांनो, वर्षभरात एवढी बडबड कराल की, तोंडाला चिकटपट्टी लावायचीच वेळ येईल.''

समीना रोज वर्गात बसायची. तिचं अभ्यासात फारसं लक्ष नसायचं. तिची वर्गातली जागा माझ्या डाव्या बाजूला अगदी माझ्याजवळ असायची. 'मानसशास्त्र' विषय समीनाला कळत नव्हता. प्रश्नांची उत्तरं विचारली की रडायला यायचं. वर्ग संपल्यावर समीना-लैला सगळी मुलं जायची वाट पाहायच्या. हळूच भीत-भीत विषय पुन्हा समजावून सांगावा म्हणून गळ घालायच्या. माझं वेळापत्रक कितीही व्यग्रता दाखवत असलं तरी या गोड पोरींना मी खास वेळ देऊन विषय समजून द्यायची. करता-करता दोघीही वर्गात छान उत्तरं द्यायला लागल्या. मानसशास्त्रावर, इंग्लिशवर मनापासून प्रेम करायला लागल्या. समीनाचं भविष्य तेव्हा तरी कोणालाच माहीत नव्हतं.

मी ऐकून होते की समीना डान्स खूप छान करते. तबला मस्त वाजवते. एक संपूर्ण वर्ष समीनाने मला कधीही डान्स दाखवला नाही व तबलाही वाजवून दाखवला नाही. समीना मुलींच्या शाळेतून आलेली. 'निवांत'च्या लेझीम ग्रुपमध्ये मात्र समीना सर्व मुला-मुलींकडून सुंदर लेझीम प्रकार बसवून घ्यायची. तिची देहबोली लेझीम करताना संपूर्ण बदललेली असायची. अभ्यास विषयांना घाबरणारी समीना तोंडात शिट्टी धरून संपूर्ण लेझीम टीमचं नेतृत्व करायची तेव्हा एकदम आत्मविश्वासानं फुललेली असायची. मी मनात म्हणायची, ''काय ही शिक्षणपद्धती? विद्यार्थ्यांना सगळेच विषय का शिकायला लागतात? त्यांच्या आवडी-निवडी, इच्छा-आकांक्षा लक्षात न घेता साऱ्यांना एकाच साच्यात का घातलं जातं?'' समीनाला देहभान विसरून लेझीम करताना पाहणं हा एक नितांत सुंदर अनुभव होता.

एक दिवस समीना मला म्हणाली, ''मॅडम, मला डान्समध्ये करियर करता येईल का?'' तेव्हा समीना बारावीला होती. मधून-मधून कधीतरी एखादं नृत्य बसवायला लागणं, वेळ पडली तर तबला वाजवणं अशी कामं समीना करताना दिसायला लागली. माझ्याही डोक्यात समीनाचा प्रश्न घोळायला लागला. खरंच, दृष्टिहीन समीना किती छान डान्स करत होती. तिच्या पायातली लय अन् देहातला ताल नक्कीच अंध नव्हता. बारावी संपत आली. मी डान्स कोर्सेसची



# कलेची 'नजर' असणारी समीना शेख

**– मीरा बडवे**

*१५ ऑक्टोबर जागतिक अंधदिन ! या निमित्ताने आपल्या अंध मैत्रिणीचा-समीनाचा नृत्यकला क्षेत्रातला आजपर्यंतचा थक्क करणारा प्रवास आपण जाणून घेऊया. तिच्यासारखीच स्वप्नं उराशी बाळगणाऱ्या, ती पूर्ण होण्यासाठी जिद्दीने, चिकाटीने, परिश्रमपूर्वक त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या कितीतरी 'समीना' आज समाजात आहेत. त्या सर्वांच्या जिद्दीला या निमित्ताने सलाम !*

जिथे पाहतो तिथे दिसे अगणित तारे, अथांग सृष्टी ।
व्यापकताहृअन् हेतु कळण्याहृ मलाहृ पाहिजे अनंत दृष्टी ।।
प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

चौकशी सुरू केली. कुलदीप 'निवांत'च्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी. जो स्वत:ला माझा थोरला लेक मानतो - तो म्हणाला, ''मॅम्, माझी मैत्रीण वरदा फडके डान्समध्ये एम. ए. करतेय. तिच्याकडे पाठवा समीनाला.'' समीनाला वरदानी अगदी मनापासून पहिले-वहिले धडे दिले. नंतर एका नृत्यपारंगत नृत्यशिक्षिकेकडे मी समीनाला घेऊन गेले. त्यांचं अन् समीनाचं अगदीच जुळेना. त्यांना सारखं वाटायचं - समीना अंध. कशा नृत्याच्या स्टेप्स् शिकणार? त्यांचा मला फोन यायचा, ''समीनाचा पाय वाकडा पडतो. तिची थिअरी कशी करून घेणार?'' समीना अगदी रडकुंडीला आली, पण तिची नृत्य शिकण्याची जिद्दच अफाट होती. मलाही खूप उदास वाटायचं. नजरेचा दोष म्हणून समीनाला नृत्य का शिकवलं जात नाही? तिची पावलं डोळसांपेक्षा अधिक सुंदर लय पकडतांना मी पाहिली होती. दोघींनाही हताश वाटलं.

अशीच विचारात गढले होते. इतक्यात नितीन पाटणकर हा माझा कर्नाटक हायस्कूलमधला विद्यार्थी मला भेटायला आला. त्यालाही मी समीनाबद्दल सांगितलं. तो म्हणाला, ''मॅडम्, मी तुम्हाला शिवाजीराव कदमांकडे घेऊन जातो. भारती विद्यापीठातही डान्स घेऊन बी.ए. करण्याची सोय आहे. माझी बायको डान्समध्ये पी. एच. डी. करतेय. पुणे विद्यापीठातील ललित-कला केंद्राची फी खूप जास्त आहे. भारती विद्यापीठात आपण समीनाला 'शैक्षणिक दत्तक योजने' अंतर्गत डान्सची डिग्री मिळवून देऊ शकतो.'' नितीन आणि मी शिवाजीराव कदमांना भेटलो. त्यांनी समीनाला 'शैक्षणिक दत्तक' योजनेखाली सामावून घेतलं.

आता पुढचा प्रवास सुरू झाला. समीना नोटस् घेऊन यायची. त्यांचं रेकॉर्डिंग, ब्रेल रूपांतरण सगळं मला जमत होतं. पण भारती विद्यापीठातल्या नृत्य विभागाला मात्र अजून शंका होती की, समीना कशी नृत्य शिकणार? सुदैवानं भारती विद्यापीठाच्या पॅनेलवर असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना शमाताई भाटे यांच्याकडे नृत्याचे धडे शिकण्याची संधी समीनाला मिळाली. त्यांना मात्र असं कधीही वाटलं नाही की, समीना नृत्य शिकू शकणार नाही. फरक इतकाच होता की, त्यांच्या वर्गातल्या अनेक मुली सात-आठ वर्षं कथ्थक शिकत होत्या. समीनाचं मात्र प्रवाहाविरुद्ध पोहणंच होतं. समीना त्यामुळेच शमाताईंच्या वर्गातल्या साऱ्या मुलींमध्ये वेगळी वाटत होती. अपरिपक्व होती. तिला सात-आठ वर्षांचा हरवलेला काळ भरून काढण्यासाठी जास्त मेहनत करावी लागणार होती. तिला शास्त्रीय नृत्य शिकणं किती कठीण असतं ते आत्ताच कळत होतं. सुरुवातीला समीनाला सारं फार जड वाटायचं. पण एकदाही समीना मेहनतीला घाबरली नाही. ही 'झाशीची राणी' लढतच राहिली. बघावं तेव्हा नृत्याची प्रॅक्टिस करताना दिसायला लागली.

लेखी परीक्षेच्या तयारीत खूप संगीतकार, नृत्य पारंगत व्यक्तींचा परिचय होत गेला. समीना अधिकाधिक प्रोत्साहित होत गेली. लेखी पेपर लिहितांना मात्र अटी भलत्याच विचित्र होत्या. भर पावसात, विजा कडाडत असताना समीनाला रायटरला दाखवायला घेऊन जावं लागलं. रायटर वयानंही एक वर्ष कमी असावा अशी विचित्र अट होती. ज्या वर्गात समीना पेपर लिहायची तो वर्ग कलकलाटानं भरलेला असायचा; पण हरेल तर समीना कसली? समीना संस्कृत शिकली. समीना इंग्लिश शिकली. दरवर्षी समीना पास होत गेली. तिच्या दृष्टी नसण्याचा नृत्य शिकताना तिनं कधीच अडसर येऊ दिला नाही. फक्त अनेक वर्षांची नृत्याची आराधना व प्रशिक्षण कमी पडत होतं, म्हणून एक वर्ष ड्रॉप घेऊन तिनं अनेक वर्षांची कसर भरून काढली. तिचे भारती विद्यापीठातले एच. ओ. डी. शारंगधर साठे सरही तिच्या प्रगतीवर बारीक लक्ष ठेऊन होते. त्यांच्या सूचनेनुसार समीनानं एक वर्ष ड्रॉप घेतला. हा निर्णय फार उपयोगी पडला. अभ्यासाचा बोजा शिरावर नसल्यानं समीना मनसोक्त नृत्याचे धडे घेत राहिली. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या गारवे मॅडम्नीही तिला खूप समजून घेतले.

समीना एक कलंदर कलाकार आहे. तिच्यातल्या कलाकाराला शमाताईंच्या नृत्यवर्गातल्या शिल्पाताईनंही परिश्रमपूर्वक घडवलं. 'निवांत' मधल्या अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक विवंचनाही फारच जास्त असते. नृत्याचा क्लास झाल्यावर समीनानं गुलाबाची (ऑरगंडीची) शेकडो फुलं बनवून, 'निवांत'च्या चॉकलेट पॅक्स्चं डेकोरेशन करून



। दिनविशेष... ४ ऑक्टोबर - जागतिक प्राणी सुरक्षा दिन ।

प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली

पैसे कमावले. निवांत आणि शुभदा मॅडम पाठीशी होत्याच. पण दैनंदिन खर्चाचा, कधी-कधी सुट्टीत दुसऱ्या होस्टेलला राहण्याचा खर्च तिनं स्वत:नं जिद्दीनं केला. 'निवांत'ला शामक डावर यांच्याकडून कोरिओग्राफर्स पाश्चात्य नृत्य शिकवायला यायला लागले. समीना तर विद्युल्लताच! कमालीच्या ताकदीनं तिनं पाश्चात्य नृत्यही शिकून घेतलं. आता 'निवांत'मध्ये ती स्वत:च कोरिओग्राफर म्हणून काम करते. रात्री उशिरा येताना त्रास नको म्हणून समीनानं निवांतमध्ये ज्यूडोही शिकून घेतलं. थोराड पोरांनाही ती आता लोळवू शकते.

समीनाचं नृत्य पाहून, तिच्यातली विजेसारखी चपळता पाहून लोक अक्षरश: थक्क होतात. तिला सध्या नृत्याचे धडे देणाऱ्या अमीरा पाटणकरचं मत आहे, ''समीनानी गेल्या तीन वर्षात खूप प्रगती केली आहे. तिच्यात नॅचरल टॅलंट तर आहेच पण परिश्रम करण्याची क्षमताही आहे. ती कधी ताणाखाली नृत्य करत नाही. सहजगत्या करते. एखादी गोष्ट शिकवली तर पटकन् आत्मसात करते.'' समीनाला आवडीचं क्षेत्र मिळाल्यामुळे समीना फुलली. तिच्यातला कलाकार बहरला. एच. एस. बी. सी. कंपनीत शाळेतल्या विद्यार्थिनींसमोर करियर गायडन्सच्या शिबिरात समीनानं खूप आत्मविश्वासपूर्वक भाषण केलं.

''नमस्कार. मित्र-मैत्रिणींनो नृत्य शिकणं वाटतं तितकं सोपं नाही. डान्स आवडणं आणि शास्त्रीय नृत्य करणं यात फार फरक असतो. शास्त्रीय नृत्य शिकताना अथक परिश्रम करण्याची, नवीन शिकण्याची तयारी लागते; पण इच्छा असेल तर मार्ग सापडतोच. आयुष्यात आपल्याला काय आवडतं याचा आधी शोध घेतला पाहिजे; तरच आपण त्या क्षेत्रात चमकू शकतो. सगळे करतात तेच मी का करावं? मी ते करावं जे मला करायला आवडतं. मी शिरूरजवळच्या अगदी छोट्या गावची. ज्या समाजातून मी आले त्या समाजात कुणीही अजून नृत्यात करियर केलं नाही. दहावीनंतर लग्न न करता शिक्षण चालू ठेवण्यासाठीही मला खटपट करावी लागली. घरच्यांची समजूत घालून, समाजाला अंधत्व हा अडथळा नाही हे पटवून देऊन मी आज तुमच्यासमोर उभी आहे. मला अभिमान वाटतो की, आता घरात 'समीना आत्यासारखं तूही मोठेपणी डान्स शीक.' असं घरातली मोठी माणसं छोट्या मुलांना सांगतात.''

नंतर समीनानं एक डान्सचा तुकडा पेश केला. सगळी आठवी ते दहावीची मुलं समीनाला गराडा घालून म्हणाली, ''ताई, आम्ही फी देऊ. तू आम्हाला डान्स शिकव ना!'' डोळ्यातलं पाणी मागे सारत मी हा सोहळा अनिमिष नेत्रांनी पाहात होते. समीनाच्या लढाईत तिला किती अडचणींना तोंड द्यावं लागलं याची अगदी जवळची साक्षीदार मी - समूची मीरामॅम्.

काल चॉकलेट्ची पाकिटं सजवतांना मला म्हणाली, ''मॅम्, तुम्हाला काहीतरी सांगायचंय. शिल्पाताई, शमाताईंनी तर माझी पाठ थोपटलीच पण साठे सरांनीही माझा पदन्यास बघून मला शाबासकी दिली. कधी एकदा तुम्हाला सगळं सांगते असं झालं होतं. मला क्वचित डोळस मुलींनाही शिकवू देतात.''

या वर्षी समीना शेख 'बी.ए. विथ डान्सिंग' होईल. नंतर अंध शाळेतल्या, 'निवांत' मधल्या अंध विद्यार्थ्यांना नृत्य शिकवणं हे तिचं स्वप्न! तिच्यासारख्या अनेक समीना तिला घडवायच्या आहेत. वादळवाऱ्याशी झुंजत प्रवास करणाऱ्या, स्वत:च्या आवडीचं नृत्यक्षितिज उभं करणाऱ्या अनेक समीना! मानसशास्त्रावर नंतर मात्र मनापासून प्रेम करणाऱ्या समीनाला मानसशास्त्र घेऊन बी. ए. करावं की नृत्य घेऊन असा प्रश्न पडला. तेव्हाही मी हसले. सहा वर्षांपूर्वी भेटलेली समू... आजची समू... केवढा फरक! तिच्यातल्या 'जिद्दी'ला सलाम करत विजू साळुंके सारखी (निवांतचे कविवर्य) समूकडे पाहून मी म्हणाले,

''समू, तू म्हणजे...

''फूल मी काट्यातले, मज वेदनेची खंत नाही
गंध माझा अडवणारी एक सुद्धा भिंत नाही.''

हे सिद्ध करणारी तळपणारी वीज आहेस. तुझ्या पावलांनाच डोळे फुटले आहेत. तू कशी अंध? कलेला फक्त कलेची 'नजर' असावी लागते.

***

**– मीरा बडवे**
'निवांत', अंधमुक्त विकासालय,
टिंगरेनगर, विश्रांतवाडी पुणे –४११००६

कुठे वेदना, भाव कशाचे, कसली माया, कुठली प्रीती ।
विराट, व्यापक ब्रह्मांडालाह्र कशाचीच हो नाही गणती ।।
**प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे**

# चित्रगोष्टी ८

चित्रा वैद्य

# संकल्पचित्र
## (डिझाईन)

*चित्रांचे प्रकार, त्यातली रंगसंगती, चित्र काढतानाचे काही अनुभव, चित्रांचा संस्कार या सगळ्या 'चित्रगोष्टीं'बद्दल चित्राताईंनी तुमच्याशी संवाद साधला. शिवाय चित्रकलेच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या स्मरणचित्र, स्थिरचित्र, निसर्गचित्र या विषयांबाबतचे मार्गदर्शनही त्यांनी या लेखमालेतून केले. या लेखमालेतला हा शेवटचा लेख. तुमची चित्रगोष्टीमधून चित्रकलेबद्दलची जाण निश्चितच वाढली असेल. चित्रांचा, त्यातल्या रंग-रेषांचा सराव तुम्हीही सुरू केला असेल, हो ना?*

एखाद्या वस्तूवरील सुंदर डिझाईन आपले लक्ष वेधून घेते. कपडे खरेदी करताना आपण नक्की काय करतो? त्याचे डिझाइन, रंगसंगती चांगली आहे का? ती आपल्याला खुलून दिसेल का? या गोष्टींचा आपण प्रथम विचार करतो. घरातील नेहमीच्या वस्तू, पर्स, चहाचा ट्रे, फुलदाणी, लँपशेड, सोफा कव्हर, पडद्याचे कापड यावरील डिझाईन त्या वस्तूंना आकर्षक बनवते.

आपली भारतीय संस्कृती आपल्यावर सौंदर्याचे संस्कार फार पूर्वीपासून करत आली आहे. वेगवेगळे सण साजरे करताना आपण घर सुंदर सजवतो. घरासमोरील अंगणात रांगोळी काढणं हे पवित्र समजलं जातं. भारतातील विविध भागातील पारंपरिक चित्रशैली, तांजोर, मधुबनी, लघुचित्रशैली, बाटीक, वारली, आदिवासीशैली, पट्टचित्रे, गोंड, फड या सर्व प्रकारात कलेचा आविष्कार ठळक व जोशपूर्ण दिसून येतो. या शैलीचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या अलंकरणात्मक (decorative) आहेत. प्रत्येक शैलीमध्ये अलंकरण करण्यासाठी डिझाईनचा वापर केला गेला आहे.

या सर्व शैलींचा पाया आपल्याला संकल्पचित्र (डिझाईन) या विषयात आढळतो. चित्रकला परीक्षांमध्ये डिझाईन हा एक महत्त्वाचा विषय मानला जातो. डिझाईन तयार करण्यासाठी भौमितिक, नैसर्गिक, अलंकारिक, अमूर्त शैलीतील विविध आकारांचा उपयोग करता येतो. यात वैविध्य साधता यावे यासाठी वेगवेगळे प्रयोग करणे आवश्यक असते. आपल्याला जर निरीक्षणाची सवय असेल तर निसर्गापासून स्फूर्ती घेऊन आपण विविध डिझाईन्स तयार करू शकतो.

संकल्पचित्र या विषयाचा अभ्यास केल्यामुळे आपल्यातील सर्जनशील आविष्कार शक्तीचा विकास होतो. तोल, प्रमाण, लय, उत्सर्जन ही संकल्पचित्राची काही मूलतत्त्वे आहेत, त्यांचा वापर केल्यास चित्र आपोआपच सुंदर दिसते.

एलिमेंटरी परीक्षेत सर्वसाधारणपणे वर्तुळ, आयत, त्रिकोण, चौकोन, षटकोन इ. बाह्य आकारांचा उपयोग करण्यास सांगितला जातो. त्या बाह्याकारात भौमितिक आकार, सरळ रेषा, वक्र रेषा, पाने-फुले, मासे, पक्षी इत्यादी घटकांच्या अलंकारिक आकारांची रचना करायची असते.

तर इंटरमिजीएट परीक्षेत या विषयांतर्गत साधारणपणे बाह्याकार म्हणून फुलदाणी, पर्स, लँपशेड, पंखा, साडीची किनार, इ. पैकी कोणताही आकार सांगितला जातो. दिलेल्या बाह्याकारात फुले, पाने, फुलपाखरे, पक्षी, मासे किंवा कोणत्याही प्रकारचे नैसर्गिक, अलंकारिक अथवा अमूर्त आकारांपासून डिझाईन बनवायचे असते. ट्रेसिंग पेपरचा उपयोग करता येणे आवश्यक असते. रेखांकन पूर्ण झाल्यावर आकर्षक रंगसंगतीने चित्र रंगवायचे असते.


आता आपण या विषयाचा सराव कसा करायचा ते पाहू. प्रथम पेपरला शोभेल अशा आकारात मध्यभागी दिलेला बाह्याकार काढून घ्यावा. डिझाईन कोणत्या वस्तूसाठी बनवायचे आहे याचा विचार करावा, प्रथम कच्ची रेखाटने करून घेऊन त्यातील योग्य वाटणारी रचना घेऊन अंतिम रेखाटन करण्यास घ्यावे. आवश्यक असल्यास ट्रेसिंग पेपरचा वापर करावा. चित्रातील आकार शक्यतो मोठे व एकमेकांना अंशत: आच्छादणारे काढावेत.



। आदरांजली... ज्येष्ठ चरित्र अभिनेते व स्वातंत्र्यसैनिक - ए. के. हंगल - २६ ऑगस्ट २०१२ ।

प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे







**चित्रकलेच्या परीक्षांमधील संकल्पचित्रांचे काही नमुने**

त्यामुळे मूळ आकार विभागले जाऊन नवीन आकर्षक आकार निर्माण होतात. चित्रात शेवटी जेथे मोकळी जागा सुटली असेल तेथे सरळ अथवा वक्र रेषा काढाव्यात. त्यामुळे चित्राचा तोल सावरता येतो.

रंगवताना योग्य रंगसंगती वापरावी. रंगचक्रातील मूळ रंग, दुय्यम रंग, तृतीय श्रेणीचे रंग, विरोधी रंग, मित्र रंग, उष्ण व शीत रंग यांचा अभ्यास करावा. रंगमिश्रणे असंख्य प्रकारे व विविध प्रमाणात करता येतात. निसर्गातील रंगसंगती पाहूनही आपल्याला स्फूर्ती मिळते. त्यामुळे त्याचा भरपूर सराव करणे आवश्यक असते. रंगसंगती आकर्षक बनवण्यासाठी बाटलीतील तयार पोस्टर कलर न वापरता दोन रंगांच्या कमी अधिक मिश्रणाने नवीन रंगछटा बनवाव्यात. सपाट रंगलेपन, छायाभेद (शेडींग), ग्रेडेशन इ. पद्धती रंगवताना वापराव्यात.

पोतनिर्मिती केल्याने हे चित्र उठावदार दिसते. ठिपके (स्टिपलिंग), मोझाइक, स्प्रे, भेंडी, चुरगळलेला कागद, दोरा यांचे ठसे घेऊन पोतनिर्मिती करता येते.

डिझाईन हा एकच असा विषय आहे की, त्यात कॉपी - कुठल्याही वस्तूची नक्कल करावी लागत नाही. निसर्गचित्र करताना आपल्याला दिलेले फूलच काढावे लागते. स्मरणचित्रात दिलेला विषय, त्यातील प्रसंग आठवून काढावा लागतो. मुक्तहस्तचित्रात तर दिलेल्या चित्राची हुबेहूब प्रतिकृती काढावी लागते. फक्त डिझाईन हा एकच असा विषय आहे की, ज्यात तुम्हाला कोणतेही आकार, रंग वापरायचे स्वातंत्र्य असते. स्वत:चे आकार, स्वत:च्या मनातली मांडणी (composition) करता येत असल्यामुळे आपल्या सर्जनशीलतेला (creativity) वाव मिळतो म्हणून हा विषय सर्वांनाच आवडतो, खरे ना?

***

**चित्रा वैद्य**
ए-३/श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई -57
info@artist-chitra.com

**ज्ञान प्रबोधिनी ,प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे**
**बालविकास शिबिर**

**वयोगट** : ७ ते १२ वर्षे
**कालावधी** : १९ ते २५ नोव्हें. २०१२
रोज १२ ते ५
**शुल्क** : ₹ १५००/- (सर्व करांसहीत)
**स्थळ** : ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे३०

**शिबिराची वैशिष्ट्ये**

- प्रशिक्षित मानसतज्ज्ञांचा पुढाकार, सहभाग
- छोट्या गटांमध्ये वैयक्तिक मार्गदर्शन
- प्रकल्प/बौद्धिक खेळ यातून क्षमतांना चालना

**संपर्क - सौ. सुजाता होनप ९४२०१७८०२०**

**नेतृत्व गुणांना संधी**

ग्रामीण दिवाळी अंकावर आधारित मेळावे घेऊ इच्छिणाऱ्या ताई-दादांनी छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

कूपामधल्याह्व बेडकापरी मति मर्यादित असे मानवी ।
तरि शोधाचाह्व यत्न करु याह्व क्षितिजे आणिक जगे नव-नवी ।।
**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

## शुभ्रक्रांतीचे जनक
# डॉ. वर्गिस कुरियन



- माधुरी बारपुते

*'अमूल' नाव घेतलं की आठवतं ते अमूल बटर, अमूल चीज, अमूल आईस्क्रिम, अमूल कुल्फी... असे अनेक खाद्यपदार्थ. दर्जा, वाजवी किंमत व विश्वास या त्रिगुणांमुळे अमूलची ख्याती देशातच नाही तर परदेशातही पोहोचली. ही प्रसिद्धी, हा विश्वास एका दिवसात मिळालेला नाही तर अनेक वर्षं, अनेक जणांनी यासाठी कष्ट घेतलेले आहेत. डॉ. वर्गिस कुरियन यांची दूरदृष्टी व कुशल व्यवस्थापन यातून झालेली अमूल डेअरीची स्थापना आणि गुजरातमधील दुग्धव्यवसायाचा विकास याची कहाणी अतिशय उद्बोधक आहे. नुकतेच डॉ. वर्गिस कुरियन यांचे निधन झाले.त्यांना छात्र प्रबोधनतर्फे विनम्र आदरांजली.*

स्वातंत्र्यपूर्व काळात आताच्या गुजरातमधील कैरा व आसपासचा प्रदेश दुधाचा प्रदेश म्हणून ओळखला जात असे. तेव्हा 'पोलसन' या खाजगी कंपनीची तेथील दुग्धव्यवसायावर मक्तेदारी होती. ब्रिटिश सरकारशी करार करून 'पोलसन' कंपनी तेथील दूध गोळा करून मुंबईला पाठवू लागली. यात शेतकऱ्यांना कमी भाव मिळून त्यांच्यावर अन्याय होत होता. याविरुद्ध लढा देण्यासाठी सरदार पटेल, त्रिभुवनदासजी पटेल, मोरारजी देसाई आदी नेते पुढे आले. पुढे ब्रिटिश सरकारविरुद्ध शेतकऱ्यांचा लढा, दुधाचा पंधरा दिवसांचा संप (ज्यामुळे मुंबईत दूधाचा तुटवडा पडला) अशी अनेक आंदोलने झाली. पोलसन डेअरीला शेतकऱ्यांनी अजिबात दूध पुरवले नाही. नेते मंडळी मैलोनमैल खेड्यापाड्यातून हिंडली. विखुरलेल्या शेतकऱ्यांना एकत्र करून १९४६ मध्ये 'कैरा जिल्हा दूध उत्पादक संघा'ची स्थापना झाली.

त्या काळात दुग्धव्यवसाय अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी परदेशात गेलेले जॉर्ज कुरियन भारतात परत आल्यावर सरकारतर्फे त्यांची नियुक्ती आणंद (जिल्हा कैरा) येथील दूध संशोधन केंद्रात झाली. परंतु तेथे संशोधनास वाव नसल्याने कुरियन यांनी त्या नोकरीचा कालांतराने राजीनामा दिला. त्यानंतर शेतकरी सहकारी संघाचे नेते त्रिभुवनदासजी पटेल यांच्या विनंतीला मान देऊन कुरियन 'कैरा जिल्हा दूध उत्पादक संघ' यांच्या कामात सहभागी झाले. वेतन अत्यल्प होते; परंतु स्वतःच्या फायद्याकरता काम केले तर मिळणारा आनंद हा क्षणभर असतो परंतु इतरांसाठी जेव्हा तुम्ही काम करता तेव्हा परिपूर्तीच्या आनंदाचं समाधान मोठं असतं; याचा विचार कुरियन यांनी केला. त्रिभुवनदासजी, कैरातील शेतकरी यांच्याबरोबर काम करायला त्यांनी सुरुवात केली. कैरा संघाच्या व्यवस्थापक पदाची सूत्रे अधिकृतपणे ग्रहण केली.

डॉ. कुरियन यांच्याकडे विधायक दिशेबरोबरच व्यावहारिक दृष्टिकोनही होता. ते कुशल व्यवस्थापक होते. हिवाळ्यामध्ये उन्हाळ्यापेक्षा म्हैस दुप्पट दूध देते तर उन्हाळ्यात कमी. त्यामुळे हिवाळ्यात मिळणाऱ्या जास्त दुधाचं काय करायचं आणि उन्हाळ्यात दूध कमी पडते यावर उपाय काय करावा असा प्रश्न होता. त्यावर उपाय म्हणून जेव्हा जरुरीपेक्षा जास्त दूध असेल तेव्हा या दुधापासून भुकटी तयार करावी व उन्हाळ्यात जेव्हा दुधाची कमतरता असते तेव्हा भुकटीपासून दूध करावं, असं कुरियन यांनी ठरवलं. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले. पण म्हशीच्या दुधापासून भुकटी बनविणे तांत्रिक दृष्ट्या अशक्य असल्याचे न्युझिलंड,



अभिनंदन... डॉ. के. विजयराघवन - एच. के. फिरोदिया पुरस्कार
(विज्ञानातील योगदानाबद्दल)
**प्रायोजक – श्री. अजित परांजपे, पुणे**

इंग्लंड येथील डेअरी तज्ज्ञांनी सांगितले. पण डॉ. कुरियन आणि त्यांचा मित्र झेरेला पेटले. आणि अथक परिश्रमातून त्यांनी म्हशीच्या दुधापासून भुकटी तयार करण्याचा जगातला पहिला कारखाना काढला.



**अमूल डेअरी**

ग्राहकांची पिळवणूक होता कामा नये, परंतु शेतकऱ्यांनाही जास्तीत जास्त फायदा मिळावा असा कुरियन यांनी सतत प्रयत्न केला. यातूनच पुढे १५ नोव्हेंबर १९५४ साली राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याहस्ते आणंद येथे अमूल डेअरीची पायाभरणी झाली. आणि ३१ ऑक्टोबर १९५५ साली पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या डेअरीचं उद्घाटन झालं. त्रिभुवनदासजींच्या नेतृत्वाने आणि कुरियन यांच्या कुशल व्यवस्थापनाने डेअरीचं काम अतिशय चांगल्या पद्धतीने चाललं. केवळ 'दूध' हा या सहकारी संस्थेच्या कामाचा केंद्रबिंदू नव्हता तर ग्रामीण व्यवस्थेमध्ये सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणणारी ती एक साधन बनली होती. लोकांमधील सुप्त शक्ती काय करू शकते, काय काय मिळवू शकते, केवढ्या बौद्धिक क्षमतेने काम करू शकते; याचं उदाहरण म्हणजे कैरा सहकारी संघातर्फे उभं केलेलं काम होय. त्रिभुवनदासजींनी, कुरियनांनी शेतकऱ्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून दिली. खेड्यातील निरक्षर लोकांच्या हाती विकासाची साधनं द्यायला हवी, त्यांना विकास प्रक्रियेत सामील करून घ्यायला हवं, त्यासाठी त्यांना स्वत:ला चालवता येईल अशी विकास यंत्रणा उभारायला हवी हे त्यांनी ओळखलं होतं. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांच्या भागभांडवलावरच डेअरीची उभारणी केली. डेअरीच्या व्यवस्थापनात शेतकऱ्यांना सामावून घेतलं. शेतकऱ्यांची मालकी असलेली आशियातील सर्वात मोठी डेअरी उभारली.

१९५६ साली स्वित्झर्लंडमधील नेस्ले कंपनीला भारतात कंडेन्स्ड मिल्क तयार करण्याचा परवाना सरकारने दिला.

परंतु त्यामागील त्यांची भूमिका काय आहे हे जाणून घेण्यासाठी सरकारतर्फे कुरियन यांची नेमणूक झाली. केंद्र सरकारने सोपवलेले काम म्हणून नेस्ले कंपनीबरोबर झालेली बैठक वादावादीची झाली. या बैठकीत नेस्ले या स्वीस कंपनीच्या व्यवस्थापकांना कुरियन यांनी पटवून दिले की, 'ज्या लोकांना गोरे लोक नेटीव (काळे) म्हणून हिणवतात त्या आमच्या लोकांनी म्हशीच्या दुधापासून भुकटी व अन्य पदार्थ बनविण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. पाच वर्षांनंतर आमच्या देशातील प्रशिक्षित तंत्रज्ञांना या कामासाठी नेमले जावे' असा आग्रह कुरियन यांनी धरला. श्री. कुरियन प्रखर राष्ट्रवादी होते. देशाचा अपमान करणाऱ्यांची त्यांनी गय केली नाही. गोऱ्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले नाही.

लाल बहादूर शास्त्रींनी एकदा या सहकारी दूध संस्थेला भेट दिली. लाल बहादूर शास्त्रींना आणंदचे यश बघून खूप आनंद झाला. ते कुरियन यांना म्हणाले, ''देशामध्ये असे अनेक आणंद निर्माण करा.'' असे अनेक आणंद उभे करण्यासाठी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड (NDDB) उभं केलं गेलं. त्याचं अध्यक्षपद कुरियन यांना देण्यात आलं. आणंद पॅटर्न प्रत्येक राज्यात निर्माण झाला नाही तरी NDDB च्या लक्षात आलं की जगामध्ये सर्वाधिक पशुधन आपल्याकडे असताना आपलं दुधाचं उत्पादन कमी आहे; म्हणून NDDB च्या गटानं एक प्रस्ताव तयार केला - 'ऑपरेशन फ्लड' - दुधाचा महापूर.

'ऑपरेशन फ्लड'च्या विविध योजनांमुळे जनावरांच्या आरोग्य विषयक सेवा, कृत्रिम गर्भरेतन, दूध उत्पादक व ग्राहकांमध्ये थेट व्यवहार, ग्राहकांच्या पैशातला जास्तीत जास्त वाटा उत्पादकाकडे जाणे व विकेंद्रीकरण (प्रत्येक खेड्यात दूध संकलन केंद्र निर्माण झाले.) या गोष्टींवर चांगला परिणाम दिसून आला.

'ऑपरेशन फ्लड'मुळे दुधाचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढलं. यामुळे १९७५ सालापर्यंत दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची आयात पूर्ण थांबली. आपला देश दुधाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. दुग्धक्रांती (सफेद क्रांती) झाली.


जसजसा एखादा देश स्वयंपूर्णतेकडे जाऊ लागतो तसतसा त्याचा परिणाम इतर देशांवर होऊ लागतो. कारण परकीय चलनवलनावर त्याचा परिणाम होतो. पूर्णपणे भारतीय तंत्रज्ञानावर आधारित अशा सहकारी तत्त्वावरच्या या डेअऱ्या पूर्णपणे भारतीय होत्या. तर परदेशी तज्ज्ञाची मदत घेतली गेली; परंतु भागभांडवलामध्ये त्यांना भागीदारी मात्र कधीही दिली नाही.

सहकारी संस्था हाही व्यवसायच असतो आणि तो व्यावसायिक पद्धतीनेच चालवला गेला पाहिजे असा कटाक्ष डॉ. कुरियन यांचा असायचा. त्रिभुवनदासजी पटेलांसारखा प्रामाणिक राष्ट्रवादी नेता व कुरियन यांचं कुशल नेतृत्व या दोघांची साथ मिळाल्यामुळे 'आणंद पॅटर्न'नी नेत्रदीपक यश मिळवलं. 'माणसं' हे भारताचं सगळ्यात मोठं भांडवल आहे आणि लोकांमधली सुप्त ताकद विधायक कामाकडे वळवून घेतली तर काय घडू शकतं; याचं उदाहरण म्हणून आणंदच्या अमूल डेअरीकडे अभिमानानं बघितलं जातं. 'अमूल - किंमत करता न येण्याजोगे' या संस्थेच्या नावातून स्वदेशी उत्पादनामागची स्वाभिमानी प्रेरणा प्रतीत होते.

अमूल डेअरीच्या निर्मितीत राष्ट्रीय एकात्मताही जाणीवपूर्वक जोपासली गेली. दूध संकलन केंद्रावर प्रथम येणाऱ्याला प्राधान्य असायचं. जात - धर्म - लिंग असा भेदभाव केला जात नव्हता. साहजिकच उच्च-नीच असा भेद गळून पडण्यात मदत झाली. पूर्वी कुटुंबात स्त्रियांना नगण्य स्थान असायचं. पण आता गाईम्हशींची धार काढून दूध काढणे, दूध संकलनकेंद्रावर घालणे इ. कामंही तीच करायला लागली. त्यामुळे दुधाचे पैसे तिच्या हातात पडू लागले. कुटुंबाला तिचा हातभार लागू लागला. तिला मान मिळू लागला. महत्त्वाच्या निर्णयात तिला सहभागी केले जाऊ लागले. हा पॅटर्न पुढे गुजरातमध्येच नाही तर चोवीस राज्यांमध्ये राबवला गेला. साडेआठ कोटी शेतकरी या सहकारी क्षेत्रात गुंतलेले आहेत. शेतकऱ्यांना आपल्यातल्या क्षमतेची जाणीव झाली. त्यांचा आत्मसन्मान जागृत झाला.

अमूलच्या प्रेरणेने निर्माण झालेली दुग्धविकास सहकारी चळवळ ही भारतातली सर्वात मोठी रोजगार योजना आहे. या योजनेमुळे शेतकरी कुटुंबाचं उत्पन्न दुपटीहून अधिक झालं आहे. मानवी नातेसंबंधातले पदर बदलले आहेत. एखादा स्वदेशी सहकार उद्योग कसा बहरतो याचे 'अमूल' हे उत्तम उदाहरण आहे.

डॉ. वर्गिस कुरियन यांचे नुकतेच ९ सप्टेंबर२०१२ रोजी वयाच्या ९१व्या वर्षी निधन झाले. पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार इत्यादी सन्मानांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला गेला. त्यांनी उभ्या केलेल्या कार्याचे हे स्मरण हीच त्यांना आदरांजली!




डॉ. वर्गीस कुरियन यांचे
जीवनकार्य, अमूलची उभारणी
याविषयी अधिक जाणून
घेण्यासाठी
'माझंही एक स्वप्न होतं'
हे पुस्तक जरूर वाचा.
लेखक - गौरी साळवी
अनुवाद - सुजाता देशमुख
प्रकाशक - राजहंस प्रकाशन
पृष्ठे - २२८ किंमत - ₹ २००
जरूर पाहा - चित्रपट 'मंथन'

***

**माधुरी बारपुते**
९१/१, अ, सीतासदन, रामलिंग
विजापूर रस्ता, सोलापूर - ४१३००३



। दिनविशेष... ९ ऑक्टोबर जागतिक टपाल (कार्यालय) दिन ।

**प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली**

# छात्र प्रबोधन - दीपावली विशेषांकाची वितरण व्यवस्था २०१२

यावर्षी महाराष्ट्र व गोवा मिळून ११२ गावांमध्ये ११७ वितरण केंद्रांद्वारा 'छात्र प्रबोधन'च्या दीपावली विशेषांकांची वितरण व्यवस्था केली आहे. या वितरण केंद्रांचे पत्ते व दूरभाष क्रमांक खाली दिलेले आहेत. सभासदांनी ३० ऑक्टोबरनंतर आपला दिवाळी अंक आपल्या गावातील वितरण केंद्रावरून, हा किंवा या वर्षातील कोणताही अंक दाखवून घेऊन जावा.

आपल्या गावातील वितरण केंद्राच्या पत्त्यावर/दूरभाष क्रमांकावर संपर्क होऊ शकला नाही तर त्या त्या विभागातील विभागसंपर्क प्रमुखांशी संपर्क साधावा.

ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु. ४०/- जादा भरले आहेत, (भरले नसल्यास व घरपोच दिवाळी अंक हवा असल्यास २० ऑक्टोबरपर्यंत छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर समक्ष/M.O.ने रु.४०/- पाठवावेत) त्यांना दिवाळी अंक घरपोच पाठविले जातील. ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील इतर सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठविला जाणार नाही.

दीपावली विशेषांक अधिकाधिक जणांना वेळेत व खात्रीशीर मिळावा, यासाठी केलेली ही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी, सर्व सभासद सहकार्य करतील असा विश्वास वाटतो. वितरण केंद्र सांभाळणाऱ्या व्यक्ती त्यांच्या नित्य व्यापातून वेळ काढून, स्वयंसेवी वृत्तीने हे कार्य करीत आहेत याची जाणीव सभासदांनी ठेवावी व कार्यकर्त्यांना सहकार्य करावे ही विनंती.

**● विभागवार वितरण केंद्र संख्या ●**

| विभाग | विभाग केंद्र | केंद्रसंख्या |
|---|---|---|
| १. पश्चिम मुंबई | बोरिवली | ९ |
| २. मध्य मुंबई, ठाणे | डोंबिवली | ५ |
| ३. रायगड, नवी मुंबई | अलिबाग | ९ |
| ४. रत्नागिरी, सिंधुदुर्ग | चिपळूण | १० |
| ५. गोवा | फोंडा | ७ |
| ६. कोल्हापूर | इचलकरंजी | ४ |
| ७. सांगली | सांगली | ६ |
| ८. सातारा | सातारा | ७ |
| ९ सोलापूर | सोलापूर | ३ |
| १०. अहमदनगर | कर्जत | ६ |
| ११. उ. महाराष्ट्र | चोपडा | १७ |
| १२. मराठवाडा | अंबाजोगाई | १४ |
| १३. विदर्भ | अकोला | ९ |
| १४. पुणे | पुणे | ११ |
| एकूण केंद्रांची संख्या | | ११७ |

**विभाग १. पश्चिम मुंबई - विभाग संपर्कप्रमुख – सौ. सुमिता पांढरे (बोरीवली) – ☎ ९९६९०५१५७३**

**बोरीवली** – सौ. सुमिता पांढरे, ए–१०२ दत्तधाम, देवीदास लेन, बोरीवली (प.) ☎ ०२२–२८९११६४१/९९६९०५१५७३

**पालघर** – श्री. तुषार राऊत, मु. पो. माहिम (आगर), कर्मवीर ज. पा. राऊत मार्ग, पालघर, जि. ठाणे ☎ ९८६०२०३१००

**विरार–वसई** – श्री. फ्रान्सिस डिमेलो, विश्वशांती, २ तलाव, वतार, पोस्ट आगासे, ता. वसई, जि. ठाणे ☎ ९८५०१८२६६१

**अंधेरी** – सौ. धनश्री शिंदे, १२अ, रूम नं. ६०३, ओम साई सोसा. साईवाडी, तेली गल्ली, अंधेरी (पू.) ☎ ९७०२५२७२८४

**विलेपार्ले** – श्री. दत्तात्रय जोशी, सी–२३, प्राची सोसायटी, शहाजीराजे मार्ग, पार्ले बिस्किटजवळ, विलेपार्ले (पू.), ☎ ९८६९०६३७७२

**बांद्रा** – श्री. मिलिंद चिंदरकर, द्वारा महात्मा गांधी विद्यामंदिर, गव्हर्नमेंट कॉलनी, बांद्रा (पू. ), मुंबई ☎ ९३२२२४२५६९

**दादर** – श्री. सतीश पै, तळ मजला, पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर (प.) मुंबई २८ ☎ ९८२०२६७३२७

**चेंबूर** – कु. मधुरा पंडित, ३–डी, दहावा रस्ता, गावठाण चेंबूर, मुंबई ☎ ९८६९४५०००१

**गिरगाव** – श्रीमती शिरीषा खरे, चंद्रशेखर बिल्डिंग, ७३– ब, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ☎ ०२२–२३८८६९३५

जीवनामध्ये अजुनि पहा तू अपार असतिल कष्ट ।
उपयोगी जगण्याची इच्छा नको होऊ दे नष्ट ।।

## विभाग २. मध्य मुंबई, ठाणे - विभाग संपर्कप्रमुख – सौ. स्मिता चावर (डोंबिवली) ☎ ९९३०१४५२११

**ठाणे** – सौ. सुप्रिया बर्वे, ३०१, निशिगंधा, म. कर्वे मार्ग, ३ रा मजला, बेडेकर हॉस्पिटलजवळ, नौपाडा (प.) ☎०२२–२५३६४३६४

**डोंबिवली** – सौ. स्मिता चावरे, २ रसराज, फ्लॅट क्र. आर.एम ६८, MIDC संतोष हॉटेल जवळ, डोंबिवली (पू.) ☎ ९९३०१४५२११

**कल्याण** – सौ. स्मिता मनोरे, डी.२/७ रत्नभिमा सोसा., डॉ. आचार्य हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) ☎ ९९२०९४८७७८

**अंबरनाथ** – सौ. अश्विनी कुलकर्णी, प्लॉट नं. ५५२, इंदुप्रभा, ३ रा मजला, खेर सेक्शन, अंबरनाथ (पू.) ☎ ०२५१–२६०१४११/९८१९४५०९१०

**बदलापूर** – श्री. चिंतामणी उगले, १०४ शकुनव्हिला सोसा., सानेवाडी, कुळगांव–बदलापूर (प.) ☎ ९४२३०८९७७४

## विभाग ३. रायगड, नवी मुंबई - विभाग संपर्कप्रमुख – श्री. राम जोशी (अलिबाग) ☎ ९४२०८३५६५०

**अलिबाग** – श्री. राम जोशी, १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग ☎ ०२१४१–२२५३०९/९४२०८३५६५०

**नागाव** – सौ. स्नेहा जोशी, नागाव हायस्कूलजवळ, नागाव, ता.अलिबाग ☎ ०२१४१–२४५६६१

**नागोठणे** – सौ. सुलभा गोखले, एस.एन. बी.३, सुरक्षा नगर, रिलायन्स टाऊनशीप, नागोठणे, ता. पेण ☎ ०२१९४–२७७९०३/९७६६३९२५६४

**मुरुड** – सौ. दीपाली जोशी, गणेश आळी, मुरुड, ता. मुरुड–जंजिरा, जि. रायगड ☎ ०२१४४–२७४४३९

**महाड** – श्री. डी. एस्. सावंत, सावित्री, नवेनगर, महाड, जि. रायगड ☎ ९८२२६२६९३२

**रसायनी** – सौ. शुभदा कोकीळ, ५ अ, वरदविनायक सोसा., राममंदिरासमोर, पो. मोहपाडा, ता. खालापूर ☎ ९८८१९०३६७३

**पनवेल** – सौ. गुंजन कुलकर्णी, बी–३/१०, अशोका गार्डन सोसा., म. फुले रोड, पनवेल ☎ ०२२–२७४५४५०७/९९३०८८२८७०

**सानपाडा** – सौ. शीला ठाकूर, माध्यमिक विद्यालय, विवेकानंद संकुल, सेक्टर नं. ४, सानपाडा, नवी मुंबई ☎ ९८६९४३८७०४

**वाशी** – सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर, जे. एन. ३/११/१५, सप्तगिरी अपार्ट. सेक्टर ९, वाशी, नवी मुंबई ☎ ०२२–२७८०१९६८

## विभाग ४. रत्नागिरी,सिंधुदुर्ग - विभाग संपर्कप्रमुख – श्री. प्रसाद काणे (चिपळूण) ☎ ९४२२४३०९००

**रत्नागिरी** – १) सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, प्रभुदेसाई हॉस्पिटल,'चिंतामणी', टिळक आळी,रत्नागिरी ☎०२३५२–२२२९५३
२) श्री. राजेश आयरे रा. भा. शिर्के प्रशाला, गुरुकुल, माळानाका, जि. रत्नागिरी ☎ ७२७६७३०२६९

**पावस** – सौ. शीतल सामंत, गणेश मंदिराजवळ, समाधी मंदिर रस्ता, पावस, जि. रत्नागिरी ☎ ९४२११३९५३०

**चिपळूण** – श्री. प्रसाद काणे, श्रीकृपा, आदर्श निवास लॉज, शिवाजी चौक, चिपळूण ☎ ९४२२४३०९००

**खेड** – सौ. नम्रता दामले, बडे हॉस्पिटलसमोर, खेड, जि.रत्नागिरी ☎ ९४२२४३३९४९

**लांजा** – डॉ. अशोक शहाणे, स्वानंद, वैभव वसाहत, लांजा ☎ ९४२११८९२४७

**राजापूर** – श्री. संजय कुलकर्णी, मु. पो. पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी ☎ ९४२१२२९७५७

**कणकवली** – श्री. औदुंबर भागवत, नक्षत्र आपा., बी. विंग, घर क्र. ६, कॉलेज रस्ता, कणकवली, जि. सिंधुदुर्ग ☎ ९४२११४७५१३

**कुडाळ** – श्री. उमेश सामंत, द्वारकाभाई, गुढीपूरवाई, पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ☎ ९४२२९६३५१७

**सावंतवाडी** – सौ. वंदना करंबेळकर, बी/७, नूतन हौ.सोसा., सबनीसवाडा, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ☎ ९८५०४७३०१२

## विभाग ५. गोवा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. मोहन आमशेकर (फोंडा) ☎ ९४२२०५८८७३

**फोंडा** – श्री. मोहन आमशेकर, डी–१, कपीला सोसायटी, खडपाबांध, फोंडा, गोवा ☎ ९४२२०५८८७३

**मार्दोळ** – श्री. शिरीष आमशेकर, मुख्याध्यापक, स्वस्तिक विद्यालय, प्रियोळ, मार्दोळ, फोंडा, गोवा ☎ ९४२११५७९२२

**मडगाव** – सौ. विनया शिंक्रे, घर नं. ४४, सेंट ज्योकीम रोड, बोर्डा, मडगाव, गोवा ☎ ९४२३८२०३३२, ९८२३२२७५१२



। आदरांजली... ज्येष्ठ ऑलिंपियन हॉकीपटू मेजर शांताराम जाधव - २६ ऑगस्ट २०१२ ।

। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा।
।प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

**वास्को** – सौ. दिपा गावकर, सी४ दुसरा मजला ब्लॉक डी अंतरिक्ष मनोर, आल्तो, दाबोली ☎ ९९२१८९७०९६

**परवरी** – श्री. वैभव केळकर, डी.एल. सामंत मेमोरिअल हायस्कूल, आल्तो, परवरी, बारदेश गोवा ☎ ९४२०८१८४८३

**म्हापसा** – श्री. प्रशांत बर्वे, श्री कन्स्लटंटस्, द्वारकानाथ सेंटर, दुसरा मजला, म्हापसा–कळंगुट रोड, म्हापसा ☎ ९४२२४५६५५५

**डिचोली** – श्री. गणेश जोशी, साष्टीवाडा, बोर्डे, डिचोली, गोवा ☎ ९४०५९२१२३१

## विभाग ६. कोल्हापूर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. विनायक गद्रे (इचलकरंजी) ☎ ९८८१५९००१८

**इचलकरंजी** – श्री. विनायक गद्रे, ५, घर नं.६८अ, झेंडा चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ☎ ९८८१५९००१८

**कुरुंदवाड** – श्री. गोपाळ जोशी, मुंढेकर वाडा, कुंभार गल्ली, गणपती मंदिराजवळ, कुरुंदवाड ☎ ९८५०९६४८१९

**हुपरी** – सौ. सुधा सांगवडेकर, राजगुरूनगर, नवीन वसाहत, हुपरी, ता. हातकणंगले ☎ ९०२८८५२०५२

**महागाव** – श्री. सुभाष सुतार, महात्मा फुले विद्यालय, महागाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर ☎ ९०९६७१२८१३

## विभाग ७. सांगली – विभाग संपर्कप्रमुख – पंकज पेडणेकर (सांगली) ☎ ९६३७०६६६१९

**सांगली** – श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली ☎ ९४२२६१६०५८

**मिरज** – डॉ. श्रीकांत कुलकर्णी, किल्ला, मिरज, सांगली ☎ ९३७२२२३४८७

**तासगाव** – श्री. प्रसाद हसबनीस, ग्रामपंचायत कार्यालयासमोर, तुपारी, ता. पलुस, तासगाव जि. सांगली ☎ ९४२३८१०४०९

**३२ शिराळे** – श्री. नाथाराव हसबनीस, घ.नं. ४६९, दत्तमंदिराजवळ, पूल गल्ली, बत्तीस शिराळा ☎ ०२३४५ – २७११८६ /९७६७६८०७०१

**कडेगाव** – डॉ. मकरंद बर्वे, बर्वे हॉस्पिटल, एस.टी.स्टँडजवळ, कडेगाव, जि.सांगली ☎ ०२३४७ – २४२१०८/९९२२२१२९०३

**इस्लामपूर** – सौ. स्वाती कुलकर्णी, मानस ग्रंथालय, के. बी. पी. कॉलेज रस्ता, इस्लामपूर ☎ ०२३४२–२२१९६१/९४०४३५९२६२

## विभाग ८. सातारा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. सतीश कुलकर्णी (सातारा) ☎ ९४२३२६०२६०

**सातारा** – श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२०–१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा ☎ ९४२३२६०२६०

**कोरेगाव** – डॉ. मिलिंद शहा, पूजा नर्सिंग होम, रहिमतपूर रस्ता, कोरेगाव, जि. सातारा ☎ ९८२२०२३२०८

**कराड** – श्री.दत्तात्रय कुलकर्णी, ४५६–डी, सोमवार पेठ, पंताचा कोट, नावडीकर वाडा, कराड ☎ ०२१६४–२२२५०५

**उंब्रज** – डॉ. धनंजय कुलकर्णी, जय श्रीराम क्लिनिक, कॉलेज रस्ता, उंब्रज, ता. कराड ☎ ९४०३५४६९१३, ९४२३३२१२१३

**खंडाळा** – श्री. अ. ल. फाळके, कोर्टाच्या मागे, खंडाळा, जि. सातारा, ☎ ९८९०६०९६३१

**पाटण** – श्री. दत्तात्रय नांगरे, मु. पो. मारुल हवेली, ता. पाटण, जि. सातारा. ☎ ०२३७२–२८६८५८/८२७५४५७२७८

**खटाव–वडूज**– सौ. पूनम शिंदे, द्वारा किसनराव शिंदे, मधला वाडा, खटाव, जि. सातारा ☎ ९९७५५९९८५१

## विभाग ९. सोलापूर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. राजशेखर कांबळे (सोलापूर) ☎ ९८९०४१५८५१

**सोलापूर** – ज्ञानप्रबोधिनी बालविकासमंदिर, १५७,रेल्वेलाइन्स, डफरीन चौक, सोलापूर ☎ ०२१७–२३१७७८२/९६८९९९९२००

**पंढरपूर** – श्री. दीपक इरकल, २३४०, होळकरवाडा, महाद्वार, पंढरपूर, जि. सोलापूर ☎ ९४०३२९३२९१

**मोहोळ** – श्री. बापूसाहेब दळवे, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला, ता. मोहोळ, जि. सोलापूर ☎ ९८५०३६३४८८

## विभाग १०. अहमदनगर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. गजानन चावरे (कर्जत) ☎ ९९६०११८५८६

**अहमदनगर** – सौ. स्नेहल धर्माधिकारी, ३६२५, डांगे गल्ली, माणिक चौक, अहमदनगर ☎ ९४२२०८४६१३

**संगमनेर** – श्री. अशोक भारंबे, स्वामी हौ. कॉम्प्लेक्स, परदेशपुरा, संगमनेर ☎ ०२४२५–२२२६६२/९९२१६४४२११

तुला लाभल्या आयुष्याला आसवांची किनार आहे ।
कर्तृत्वाच्या आलेखाचा परंतु त्यामधि मिनार आहे ।।

**कोपरगाव** – डॉ. अंजली फडके, फडके हॉस्पिटल, धरणगाव रस्ता, कोपरगाव ☎ ९३२५९५०१२१

**शिर्डी** – डॉ. प्रबोध जोशी, जोशी हॉस्पीटल, शिर्डी ☎ ९४२१५५८४६६

**कर्जत** – श्री. गजानन चावरे, गवंडे गल्ली, कर्जत, जि.अहमदनगर ☎ ०२४८९–२२२९१२, ९९६०११८५८६

**पारनेर** – सौ. सविता रेपाळे, पानोली रोड, मराठा कॉम्प्लेक्स तळमजला, पारनेर ☎ ९९२२२२७११८, ९९२२२५१६६७

## विभाग ११. उत्तर महाराष्ट्र - विभाग संपर्कप्रमुख – श्री. पवन लाठी (चोपडा) ☎ ९४२३९१५५२९

**नाशिक** – श्री. अनिल दंडगव्हाळ, श्रीहरी प्लॉट नं. ४१४, चाणक्यनगर, कामटवाडे शिवार, नाशिक ☎ ९४२२२४८२६४

**बोलठाण** – डॉ. सुभाष जोशी, मु. पो. बोलठाण, ता. नांदगाव, जि. नाशिक ☎ ०२५५२–२४५३१८/९८८१८२६६०१

**मालेगाव** – डॉ. रागिणी भिलसेकर, वीर सावरकर नगर, कलेक्टर पट्टा, सटाणा नाका मालेगाव,नाशिक ☎ ९५०३२२२३९६

**धुळे** – श्री. एन. एम जोशी, घासकडबी विज्ञान प्रयोगिका, रमाई, व्यंकटेश सभागृह, नगरपट्टी, ५वी गल्ली, धुळे ☎ ९४२१५००८८२

**देऊर बु ।।** – श्रीमती स्वरूपा देवरे, मुख्याध्यापक माध्यमिक कन्या विद्यालय, देऊर बु. ।।, जि. धुळे ☎ ७५८८६२८८११

**साक्री** – श्री. चंद्रकांत देविदास पंचभाई, मु. पो. कासारे, ता. साक्री, जि. धुळे ☎ ०२५६८ – २७४२५१/९४२१५३७५०४

**शिरपूर** – प्रा. वैशाली पाटील–देवरे, आय.एम.आर.डी. कॉलेज कॅम्पस, करवंद नाका, शिरपूर ☎ ९८२३२९९९७३

**दोंडाईचा** – श्री. सुभाष जैन, द्वारा – किर्ती मेडिकल स्टोअर्स, शिवाजी मार्ग, दोंडाईचा, जि. धुळे ☎ ९८२३४१६८४४

**नंदूरबार** – डॉ. वैशाली काणे, डॉ. काणे हॉस्पिटल, धुळे रस्ता, ३१ दत्तनिवास, नंदूरबार ☎ ९४२३९८०२९६

**शहादा** – सौ. सुनिता पटेल, सुश्रुत नर्सिंग होम, खेतीया रोड, शहादा, नंदूरबार ☎ ०२५६५–२२३४४६/९४२०२७११०१

**जळगाव** – १) श्री. अनिल भोळे, द्‌वारा पांडेज्‌ क्लासेस, ट्रॅफिक गार्डनसमोर, जळगाव ☎ ९४२०६६२७१४

२) श्री. अजय नाईक, १२/३ मकरंदनगर, हनुमान हौ. सोसायटीजवळ, जि. जळगाव ☎ ९४०३४२६४३०

**भडगाव** – डॉ. सुवर्णा पाटील, द्वारा–डॉ. दिलीप पाटील, चिंतामणी हॉस्पिटल, मेन रोड, भडगाव, जि. जळगाव ☎ ७५८८०१०६७५

**चोपडा** – श्री. सुधाकर केंगे, विवेकानंद नगर, यावल रस्ता, चोपडा जि. जळगाव ☎ ९४२३९१५५२९

**चाळीसगाव**– डॉ. मुकुंद करंबेळकर, शल्यशोभा, करगाव रस्ता, चाळीसगाव, जि. जळगाव ☎ ९८२२२६३२७९

**भुसावळ** – श्री. अनिल जोशी, मुक्ताई, पुरुषोत्तमनगर, भुसावळ ☎ ०२५८२–२२११५३/९३२६११८०२८

## विभाग १२. मराठवाडा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. केदार वाघमारे (अंबाजोगाई) ☎ ९४२१९६०५९९

**औरंगाबाद** – १) चि. शुभम्‌ जोशी, प्लॅट नं.७, सूर्यकिरण अपार्ट,जालान नगर, रेल्वेउड्डाण पूलाजवळ, पैठण रस्ता ☎ ९४०३६२९१३८

२) सौ. भारती कुलकर्णी, घर क्र. ५, म्हाडा कॉलनी, प्रतापनगरच्या समोर, औरंगाबाद ☎ ९३२४०११३४९

**कन्नड** – श्री. प्रशांत कोटकर, यज्ञप्रकाश तुळजाभावानी एस.टी.डी.समोर, कन्नड, जि. औरंगाबाद ☎ ९४२१५१४६७६

**जालना** – १) श्री. विजय देशमुख, डॉ. प्रभू यांच्याशेजारी, भाग्यनगर, जुना जालना ☎ ९४२३४५७६५५

२) श्री. चंद्रकांत दायमा, ब्लॉ. नं. ३, राज बिल्डिंग, अंबर हॉटेलशेजारी, नवीन जालना ☎ ९४२१८६१५४८५

**बीड** – श्री. कैलास लिंगे, द्वारा – सरवदे, सद्‌गुरूकृपा, जवाहर कॉलनी, हॉटेल रायरीशेजारी, नगरनाका, बीड ☎ ९८८१४५१३५७

**गेवराई** – श्री. सदानंद कुलकर्णी, संकल्प निवास, तगडगाव रस्ता, सरस्वती कॉलनी, गेवराई ☎ ९४२२७०७४६८

**अंबाजोगाई** – ज्ञान प्रबोधिनी, मधुस्मृती, केशवनगर, अंबाजोगाई, जि.बीड ☎ ९९६०४०३१४४

**माजलगाव** – श्री. निरंजन वाघमारे, उषःकाल निवास, यशवंत करिअर अॅकॅडमी, कालिकानगर, माजलगाव ☎ ९८८१८६७१२३

**धाराशिव** – श्री. बालाजी माळी, द्वारा – सुनील महाजन, बनशंकरी, समर्थनगर, धाराशिव ☎ ९४०३३९११०६



। अभिनंदन... नेमबाज विजयकुमार - खेलरत्न पुरस्कार
(लंडन ऑलिंपिकमधील रौप्यपदक विजेता)
**प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे**

**हराळी** – ज्ञान प्रबोधिनी, द्वारा दिपक कांबळे, हराळी, डाक तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद ☎ ०२४७५-२६०१०२

**लातूर** – श्री. अमोल होनमाळे, श्याम नगर, गगन विहार जवळ, बोरगावकर क्लासेस समोर, अंबाजोगाई रोड, लातूर ☎ ८१४९९६०५५५

**परभणी** – श्री. प्रताप देशपांडे, द्वारा-श्री. खेडकर, हनुमान मंदिराशेजारी, लोकमान्य नगर, परभणी ☎ ९४०४९७४६१९

**सेलू** – श्री. भालचंद्र गांजापूरकर-जोशी, १८१ मल्हार, विद्यानगर (प.), रेस्ट हाऊस जवळ, सेलू ☎ ९४२२८६९५२२

**वसमतनगर** – श्री. जी. आर आर्किलवाड, बहिर्जी स्मारक विद्यालय, वसमतनगर, ता. वसमत, जि. हिंगोली ☎ ९८२२८८८३०६

## विभाग १३. विदर्भ विभाग संपर्कप्रमुख – श्री. भूषण बापट (अकोला) ☎ ९८५०३८६४९४

**अकोला** – श्री. भूषण बापट, द्वारा मिहीर उद्योग केंद्र, 'केशव अर्चना', गांधी चौक, अकोला ☎ ९८५०३८६४९४

**वाशीम** – डॉ. सुनिता घुडे, अंकुर हॉस्पिटल, सिव्हील लाईन्स, वाशीम ☎ ९८२२२०४५१५

**अमरावती** – १) श्री. प्रदीप व्यवहारे, ५, श्रेयस, हरिओम कॉलनी, जेल रस्ता, कॅम्प, अमरावती ☎ ९८६०६७४७७२

२) सौ. विद्या कुलकर्णी, ऋषीप्रसाद, पुष्कराज कॉलनी, मु. पो. सातुणी, अमरावती ☎ ९४२३१२४५९२

**वर्धा** – श्री. मंदार देशपांडे, द्वारा-ज्ञानेश्वरराव ढगे, स्वदेशी भवन, मगन संग्राहलयाजवळ, बॅचलर रोड, वर्धा ☎ ९४२०४१५६४८

**यवतमाळ** – श्री. उदय नवलेकर, मोरया अपार्टमेंट, प्लॉट नं. २०, बी विंग, यवतमाळ ☎ ९३७२६५०४५२

**उमरखेड** – श्री. धनंजय कुदे, स्टेट बँक कॉलनी, श्रीराम मंदिराजवळ, उमरखेड, जि. यवतमाळ ☎ ९४०३४६००४८

**चंद्रपूर** – श्री. मुकुंद घरोटे, श्रीराम बुक डेपो व स्टेशनर्स, भगतसिंह चौक, पठाणपुरा रस्ता, चंद्रपूर ☎ ९०११६३१६५८

**वरोरा** – श्री. उमेश लाभे, लोकमान्य विद्यालय, ता. वरोरा, चंद्रपूर ☎ ९४०३२४२७०५

## विभाग १४. पुणे - विभाग संपर्कप्रमुख – श्री. रवींद्र भोसले (पुणे) ☎ ९८५०७३१०७१

**पुणे** – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३० ☎ ०२०-२४२०७१०६ /१७४

**निगडी** – श्री. प्रमोद सादुल, ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय, पेठ क्र.२५, निगडी प्राधिकरण, पुणे ☎ ०२०-२७६५४३८०/९८६०६८५१८२

**चिखली** – श्री. गौतम इंगळे, दादासाहेब नाटेकर गुरुकुल चिखली, जि. पुणे ☎ ०२०-२७४९१४९६ / ९७३०२३७३८८

**साळुंब्रे** – श्री. तांबे,ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे, ता. मावळ, जि. पुणे ☎ ०२११४-२२३३७१ /९७६७५८०५५३

**शिवापूर** – श्री. संजीव तागडे, कृषीतांत्रिक विद्यालय, ज्ञान प्रबोधिनी, शिवापूर वाडा, ता. हवेली ☎ ०२०-२४३८४०१३/९२७००८४७०९

**इंदापूर** – श्री. तुषार रंजनकर, अल्फाबाईट कॉम्प्युटर्स, नगरपालिकेच्या मागे, इंदापूर ☎ ९४२२३२९६१६

**चाकण** – डॉ. अविनाश अरगडे, महात्मा फुले चौक, चाकण, ता. राजगुरुनगर ☎ ९४२३५७१५५२

**शिरुर** – श्री. प्रशांत अवचट, घर नं. १४३५, हुडको कॉलनी, ता. शिरूर (घोडनदी) ☎ ०२१३८-२२४१६९/९८८१०४९४३८

**बारामती** – सौ. मयुरा कानिटकर, जनहित प्रतिष्ठानचे गुरुकुल, तपोवन कॉलनी, घारे इस्टेट, बारामती ☎ ९४२३५८४३२४

**सासवड** – कल्पना खांडेकर, नागनूर- 'गुरुकुल' विद्यालय, सोपाननगर, सासवड, ता. पुरंदर ☎ ९४२३२०८१०१/९६६५९६४३०७

**भोर** – शुभांगी सदानंद मुकादम, ६१७ आमराई आळी, ता. भोर, ☎ ०२११३-२२२९०३/९६२३०९३९६०

---

**वितरण केंद्र प्रमुखांसाठी : सर्व वितरण केंद्रांवर २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरच्या दरम्यान दिवाळी अंक पाठविले जातील. केंद्रांनी अंकांची नोंदणी १२ ऑक्टोबरपर्यंत मुख्य केंद्रावर कळवावी. पुस्तके, दिनदर्शिका, D.V.D.'s इ. ची मागणी १५ ऑक्टोबरपर्यंत मुख्य कार्यालयात नोंदवावी म्हणजे वाहनाबरोबर ते साहित्य पाठविता येईल. सर्वांनी दिवाळी अंकाच्या हिशोबांपैकी काही देणे राहिले असल्यास ते व सभासद नोंदणी पत्रक व पुस्तके – दिनदर्शिका यांचे पैसे २० ऑक्टोबरपूर्वी पुण्यास पाठवावेत.**

आले भरून आभाळ आले पावसाचे थेंब ।
भरे हृदय भावनांनी होई काव्याचा आरंभ ।।

... छात्र प्रबोधनच्या विविध उपक्रमांद्वारे केंद्रावर मूलभूत क्षमता विकसनाची जाणीव निर्माण करणे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कुमार गटासाठी कार्यक्रमांची आखणी होते. आजपर्यंत नियोजन केलेल्या कार्यक्रमामधून व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे, अभ्याससहली, गिरीभ्रमण, वर्षासहली, कृतिसत्रे, स्वयंअध्ययन कौशल्य, प्रात्यक्षिके, सायकल सहली, प्रयत्नवादी विद्यार्थ्यांच्या मुलाखती अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे नियोजन केले गेले. निरनिराळ्या क्षमतांविषयी विद्यार्थ्यांसमोर कार्यक्रमांमध्ये चर्चा करताना साहजिकच आपल्याही क्षमतांचा धांडोळा घ्यावासा वाटतो आणि आपल्यातही तसे बदल घडून आल्याचे समजले की आनंद होतो... **श्री. शाम कोकीळ,** रसायनी केंद्र

*

... १९९७ साली छात्र प्रबोधन मासिकाबद्दल माहिती मिळाली. मुलांसाठीच्या मासिकाचे नाव इतके क्लिष्ट कसे? त्यात काय असणार? ते मुलांना कितपत आवडेल? असे अनेक प्रश्न मनात ठेवून अंक हाती घेतला आणि मग पूर्णपणे उलटापालट झाली- माझी आणि मुलांचीही. पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे मुलांसाठी जे काही शोधत होते तेच हे मासिक ! नुसते कृतिशीलता जोपासणारे नसून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असणारे! या मासिकाच्या पायावरच बोरीवली केंद्र सुरू झाले. हे मासिक अमृतमहोत्सव वर्षही साजरे करील याची खात्री आहे...

**सौ. अंजली केशव जोशी**, बोरीवली केंद्र

*

## माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

### छात्र प्रबोधन २० वर्षांची वाटचाल

### गावोगावच्या केंद्रप्रमुखांच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया

... गेली १२/१५ वर्षे माझा छात्र प्रबोधनशी संबंध आहे. सुरुवातीला पालक-वाचक म्हणून. आजचा विद्यार्थी नुसता परीक्षार्थी न बनता तो बहुश्रुत, चतुरस्र असावा यासाठी छात्र प्रबोधनचे मोठे योगदान आहे. वाचक विद्यार्थ्यात आपण देशासाठी, समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही जाणीव निर्माण होते. प्रत्येक पानावर खाली असणाऱ्या दोन काव्यपंक्तीसुद्धा प्रेरणादायी असतात.

माझ्या व्यवसायातून उपलब्ध मर्यादित वेळात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत अंक पोहोचविण्यासाठी मी प्रयत्नशील असतो. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधनच्या वतीने चालू असलेल्या या मनुष्यघडणीच्या प्रक्रियेत माझा हा खारीचा वाटा...

**श्री. प्रसाद काणे,** चिपळूण केंद्र

*

... प्रबोधिनीच्या वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणाची कल्पना गावोगावच्या विद्यार्थ्यांपर्यंत कशी पोहोचणार? 'छात्र प्रबोधन'ने ही जबाबदारी घेतली. अंक निघाला. २० वर्षं झाली विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना प्रबोधित करतो आहे... वेगळ्या सहली, उपक्रम, जगण्याला अर्थ देणाऱ्या कल्पक सूचना आणि हे सगळं मुलांना गंमत वाटेल, आनंद होईल, सहज समजेल अशा पद्धतीने ! अनेक माणसं जोडली गेली. शांतपणे गाजावाजा न करता माणसं घडवणारा हा उपक्रम ही एक ज्ञानयज्ञाची यात्रा आहे. ही ज्ञानयात्रा चाळीसगावमध्ये पोहोचविण्याचा प्रयत्न गेली १० वर्षे करीत आहे. याचा मनापासून आनंद वाटतो...

**डॉ. मुकुंद करंबेळकर**, चाळीसगाव केंद्र

*




हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ९ आश्विन, शके १९३४, १ ऑक्टोबर २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

# साद घालती हिमशिखरे...



लेह-लडाखची ही प्रकाशचित्रे पाहून
जावसं वाटतंय ना?!
ही चित्रे पाहून एखादी कविता सुचतेय का?
की काही छोटेखानी लेख लिहिताय?
निदान प्रत्येक चित्रासाठी छानसे शीर्षक सुचवा.

(प्रकाशचित्रे – मानस कुलकर्णी)



तुम्ही कधी हिमालयात गेलायत?
तिथले अनुभव, तिथे तुम्ही काढलेली
प्रकाशचित्रे आमच्याकडे जरूर पाठवा.



मूळ रंगीत प्रकाशचित्रे छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर अवश्य पाहा.

सौर आश्विन, शके १९३४/ऑक्टोबर २०१२, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

**सौर दिनदर्शिका शके १९३४**

| | ऑक्टोबर २०१२ | आश्विन कार्तिक |
|---|---|---|
| सो. | 1 | ९ |
| मं. | 2 | १० |
| बु. | 3 | ११ |
| गु. | 4 | १२ |
| शु. | 5 | १३ |
| श. | 6 | १४ |
| र. | 7 | १५ |
| सो. | 8 | १६ |
| मं. | 9 | १७ |
| बु. | 10 | १८ |
| गु. | 11 | १९ |
| शु. | 12 | २० |
| श. | 13 | २१ |
| र. | 14 | २२ |
| सो. | 15 | २३ |
| मं. | 16 | २४ |
| बु. | 17 | २५ |
| गु. | 18 | २६ |
| शु. | 19 | २७ |
| श. | 20 | २८ |
| र. | 21 | २९ |
| सो. | 22 | ३० |
| मं. | 23 | का. १ |
| बु. | 24 | २ |
| गु. | 25 | ३ |
| शु. | 26 | ४ |
| श. | 27 | ५ |
| र. | 28 | ६ |
| सो. | 29 | ७ |
| मं. | 30 | ८ |
| बु. | 31 | ९ |

# नरसखा तुम नरनारायण

नरसखा तुम नरनारायण
छोडके ब्रह्मानन्द
नर-नारी का दु:ख हटाने
आये विवेकानन्द ।।

धोर तमस के अंधकार से
कर्मकांड आचार रूढि से
मुक्त कराने भारत खंड
त्रिकालदर्शी ब्रह्मर्षि तुम
स्वामी विवेकानन्द...................... ।।१।।

ऊँच नीच और जात पात का
नर-नारी और गरीब अमीर का
आये मिटाने द्वंद्व
त्रिकालदर्शी ब्रह्मर्षि तुम
स्वामी विवेकानन्द...................... ।।२।।

धर्म नहीं है केवल वन में
मंदिर मस्जिद और गिरिजा में
धर्म निहित है सबके हृदय में
सिखाने अनुष्ठान वेदान्त
त्रिकालदर्शी ब्रह्मर्षि तुम
स्वामी विवेकानन्द...................... ।।३।।



**स्वामी विवेकानंद**
**शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त**
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला -९

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 13-1/Oct. 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर ९ आश्विन, शके १९३४
१ ऑक्टोबर २०१२
**www.chhatraprabodhan.org**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

**प्रति -**